https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १७४ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि. ५ ऑगस्ट २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## उत्तरकाशीमध्ये ढगफुटी; १४ सेकंदात सगळं गाव उद्ध्वस्त

### घरांसह अनेकजण ढिगाऱ्याखाली गाडले गेले

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५धराली उत्तराखंड**

उत्तराखंडमध्ये गेल्या काही दिवसांपासून पावसाचा प्रकोप पाहायला मिळत आहे. मुसळधार पावसामुळे आलेल्या पुरामुळे अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात नुकसान झालं. अशातच मंगळवारी उत्तरकाशीमध्ये ढगफुटी प्रलय आलाय. उत्तर काशीच्या धराली गावात ढगफुटी झाली. धराली येथील खीर गंगेच्या पुरात अनेक घरे वाहून गेली असून बचाव कार्य सुरू आहे. ढगफुटीनंतर पाण्याचा मोठा प्रवाह धराली गावातील बाजारपेठेत आला ज्यामुळे मोठा हाहाकार उडाला. या घटनेचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

उत्तराखंडमधील धराली गावात ढगफुटीमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. पाण्याच्या प्रवाहात डझनभर घरे वाहून गेली आहेत. स्थानिक प्रशासन बचावकार्यासाठी रवाना झाले आहे. ही घटना बारकोटजवळ घडली. ढगफुटीमुळे डोंगराचा मोठा भाग पाण्यासह खाली आणि गावात घुसला. धराली खीर गड येथे पाण्याची पातळी वाढल्याने धराली बाजाराच मोठं नुकसान झालं. गंगोत्री धामचा मुख्य थांबा असलेल्या



धराली येथील खीर गंगा नदीत ढगफुटी झाल्याने प्रचंड नुकसान झाले. विनाशकारी पुरामुळे सुमारे २० हॉटेल्स आणि होमस्टेचे नुकसान झाले आहे. त्यामुळे अनेक स्थानिक लोक आणि कामगार गाडले गेल्याची शक्यता आहे.

उत्तरकाशीमध्ये, हरसिल परिसरातील खीर गडच्या पाण्याची पातळी वाढल्यामुळे आणि धरालीमध्ये झालेल्या नुकसानीमुळे पोलिस, एसडीआरएफ, सैन्य आणि इतर आपत्ती प्रतिसाद पथके घटनास्थळी मदत आणि बचाव कार्यात सहभागी झाली आहेत. त्यामुळे प्रत्येकाने नदीपासून योग्य अंतर राखले पाहिजे. स्वतःला, मुलांना आणि गुरांना नदीपासून योग्य अंतरावर घेऊन जा, अशी माहिती उत्तराखंड पोलिसांनी दिली.


पाण्याचा प्रवाह पाहून दूर असलेल लोक ओरडत होते. पाण्याचा मोठा प्रवाह गावाकडे येताच लोक ओरडू लागले. अनेक हॉटेलमध्ये पाणी आणि मातीचे ढिगारा शिरला. धाराली बाजारपेठ पूर्णपणे उद्ध्वस्त झाली आहे. अनेक हॉटेलची दुकाने उद्ध्वस्त झाली आहेत. गेल्या २ दिवसांपासून येथे मुसळधार पाऊस पडत आहे.

## महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका दिवाळीनंतर

### राज्य निवडणूक आयोगाची माहिती; निवडणुकीत व्हीव्हीपॅडचा वापर होणार नाही

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५अमरावती**

गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात मोठ्या घडामोडी पाहायला मिळत आहेत. माणिकराव कोकाटेंचं 'रमी' प्रकरणावरून कृषीमंत्रीपद काढून घेण्यात आलं. पण त्यांना क्रीडामंत्रीपद देऊन लगेच पुनर्वसनही करण्यात आलं. विरोधकांकडून यावरून सरकारला लक्ष्य केलं जात आहे. दुसरीकडे कोल्हापुरातील महादेवी हत्तीण वनतारा येथे गेल्यानंतर त्यावरून राजकीय वाद सुरू झाला आहे. त्यातच आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका, मनसे-







उद्धव ठाकरे युतीच्या चर्चा यामुळे राज्यातलं राजकीय वातावरण चांगलंच ढवळून निघालं आहे.

महाराष्ट्रात दिवाळीनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होतील, अशी माहिती राज्य निवडणूक आयोगाकडून देण्यात आली आहे. त्यामुळे या निवडणुका डिसेंबर किंवा जानेवारीपर्यंत होण्याची शक्यता आहे. तसेच, या निवडणुका एकाच टप्प्यात न होता वेगवेगळ्या टप्प्यांमध्ये होणार असल्याची माहितीही समोर आली आहे.विशेष म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी व्हीव्हीपॅट मशीन असणार नाही, असे देखील संकेत राज्य निवडणूक आयुक्तांनी दिले आहेत.देशात राज्य निवडणूक आयोगाच्या अख्त्यारित ज्या निवडणुका होतात त्यावेळी व्हीव्हीपॅट मशीनचा वापर केला जात नाही. कारण एकापेक्षा जास्त प्रभाग पद्धत असते. त्यामुळे एका पेक्षा जास्त उमेदवार निवडून द्यायचे असतात. तसेच त्यांची मतमोजणी करायची असते. त्यामुळे व्हीव्हीपॅटचा वापर यंदाच्या निवडणुकीत होणार नाही, अशी माहिती राज्य निवडणूक आयुक्तांनी दिली.निवडणुका या ईव्हीएम मशीनद्वारेच होणार आहेत. तसेच या निवडणुका डिसेंबर ते जानेवारी महिन्यादरम्यान होतील, अशी देखील माहिती राज्य निवडणूक आयुक्तांनी दिली आहे.

## स्टार्टअप उद्योजगता धोरण जाहीर

### समृद्धी फ्रेट कॉरिडॉर मंजूर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५मुंबई**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. एकीकडे समृद्धी महामार्गावरून सरकारवर टीका करण्यात येत असली, तरी वाढवण बंदर ते समृद्धी महामार्गाला जोडणाऱ्या एका फ्रेट कॉरिडॉरला या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आलेली आहे. तसेच महाराष्ट्र स्टार्टअप, उद्योजगता धोरण जाहीर करण्यात आले आहे.





महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या अतिरिक्त जमिनींचा व्यापारी तत्वावर वापर तसेच सुधारित धोरणास मंजुरी या मंत्रिमंडळ बैठकीत देण्यात आली आहे. याशिवाय, राज्य शासनाच्या छोट्या, चिंचोळ्या आकाराच्या, बांधकामास अयोग्य, उपयुक्त आकार नसलेल्या, सुलभ पोहोच मार्ग नसलेल्या किंवा लॅण्ड लॉक्ड स्वरुपातील भूखंडांच्या वितरण धोरण मंजूर करण्यात आले आहे.महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या अतिरिक्त जमिनींचा व्यापारी तत्वावर वापर तसेच सुधारित धोरणास मंजुरी या मंत्रिमंडळ बैठकीत देण्यात आली आहे. याशिवाय, राज्य शासनाच्या छोट्या, चिंचोळ्या आकाराच्या, बांधकामास अयोग्य, उपयुक्त आकार नसलेल्या, सुलभ पोहोच मार्ग नसलेल्या किंवा लॅण्ड लॉक्ड स्वरुपातील भूखंडांच्या वितरण धोरण मंजूर करण्यात आले आहे.

## मराठीशी पंगा महागात! निशिकांत दुबेंच्या अडचणी वाढण्याची शक्यता; मनसेकडून याचिका दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५ मुंबई**

: भाजपा खासदार निशिकांत दुबे यांनी पंधरा दिवसांपूर्वी मराठी भाषेबाबत आणि मराठी माणसांबद्दल जे उद्गार काढले की, महाराष्ट्र आमच्या तुकड्यावर जगतो... मराठी माणसाला पटक पटक के मारेंगे..., या विधानांबाबत काही दिवसांपूर्वी निशिकांत दुबे यांना नोटीस बजावली होती. यामध्ये पंधरा दिवसांत मराठी माणसाची माफी मागावी, अशी मागणी आम्ही केली होती. परंतु, या नोटिसीला निशिकांत दुबे यांनी प्रतिसाद दिला नाही. या अनुषंगाने आमच्या वकिलांनी नाशिक



न्यायालयात दावा दाखल केला आहे, अशी माहिती मनसे शहराध्यक्ष सुदाम कोंबडे यांनी दिली.

पहिली इयत्तेपासून हिंदी सक्तीचा मुद्दा, त्याला मनसे, शिवसेना ठाकरे गट तसेच राज्यातील अनेक संस्था संघटना यांनी केलेला विरोध यानंतर मराठी-अमराठी वाद निर्माण झाला. यानंतर भाजपा खासदार निशिकांत दुबे यांनी केलेली अनेक विधाने वादग्रस्त ठरली. याला राज ठाकरे यांनीही प्रत्युत्तर दिले. यानंतरही निशिकांत दुबे यांना विधाने करण्याचा सिलसिला सुरूच राहिला. यामुळे आता मनसेकडून नाशिक कोर्टात निशिकांत दुबे यांच्याविरोधात याचिका दाखल केला आहे.

दरम्यान, पटक पटक के मारेंगे आणि आप हमारे तुकडों पे पलते हो, ही दोन्ही वाक्ये मराठी माणसासाठी बदनामकारक होती. ... यांनी संपूर्ण मराठी माणसाचे प्रतिनिधित्व घेऊन निशिकांत दुबे यांना नोटीस पाठवली होती. ही वाक्ये मागे घ्यावीत आणि मराठी माणसाची माफी मागावी. यासाठी १५ दिवसांची मुदत दिली होती. ही नोटीस निशिकांत दुबे यांना पोहोचली होती. तशी पोच मिळाली. परंतु, त्यांनी माफी मागितली नाही. त्यामुळे आता नाशिक कोर्टात याचिका दाखल केली होती. भारतीय न्याय संहितेच्या ३५६ कलम, ३५२ कलम अंतर्गत ही याचिका केली आहे. निशिकांत दुबे यांनी आपले दावे कोर्टात सिद्ध करावेत, असे वकील मनोज पिंगळे यांनी म्हटले आहे.

## भरदिवसा नागपूर उड्डाणपुलावरून उडी घेत सुरक्षारक्षकाने केली आत्महत्या

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५नागपूर**

भरदिवसा मानकापूरकडे जाणाऱ्या उड्डाणपुलावरून उडी घेत सुरक्षा रक्षकाने आत्महत्या केल्याने खळबळ उडाली आहे. उड्डाणपुलाखाली रहदारी असताना त्याने हे टोकाचे पाऊल उचलले. यशवंत रमेश शाहू (३१, कुकरेजा नगर, जरीपटका) असे मृतक सुरक्षारक्षकाचे नाव आहे. तो मेस्को' मध्ये सुरक्षारक्षक म्हणून कार्यरत असल्याची माहिती समोर आली आहे. दुपारी दीड वाजेच्या सुमारास कोराडीहून सदरच्या दिशेने निघाला होता. पागलखाना चौकाजवळ त्याने गाडी थांबविली व हेल्मेट काढून तो उड्डाणपुलाच्या कठड्याजवळ जाऊन उभा झाला. बराच वेळ तो तेथे उभा होता व अचानक त्याने रेलिंगवर चढून खाली उडी मारली. ते पाहून वाहनचालकांनी वाहने थांबविली व खाली पाहिले. यशवंत रस्त्यावर रक्ताच्या थारोळ्यात पडला होता. खालील रस्त्यावरून जाणाऱ्यांसाठी देखील हा मोठा धक्का होता. तातडीने पोलिसांना माहिती देण्यात आली. मानकापूर पोलिसांनी त्याला मेयो इस्पितळात नेण्यात आले. मात्र, त्याला मृत घोषित करण्यात आले.

दरम्यान, त्याने उडी मारताच काही वाहनचालकांनी उड्डाणपुलावरून व्हिडीओ बनविला. तर खाली रस्त्यावरदेखील लोक व्हिडीओ बनवत होते. त्याने गणवेश घातला होता व रक्तबंबाळ अवस्थेत तो पडला होता. पोलिस आल्यानंतरच त्याला रुग्णवाहिकेतून इस्पितळात नेण्यात आले.

## खोलापूर परिसरात अवैध वाळू वाहतूक रोखण्याच्या प्रयत्नांना यश; ट्रॅक्टर निंबाच्या झाडाला धडकून पलटी; चालक पसार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५ वाठोडा शुक्लेश्वर**

वाठोडा शुक्लेश्वर-खोलापूर मार्गावरून मध्यरात्रीच्या सुमारास अवैधरित्या वाळूची वाहतूक करणारा ट्रॅक्टर ट्रॉलीसह पलटी झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. सदर ट्रॅक्टर सोनारखेडा येथील पूर्णा नदी पात्रातून वाळू घेऊन भरधाव वेगाने जात असताना, गुप्त माहितीनुसार पेट्रोलिंग करणाऱ्या पोलिसांनी त्याचा पाठलाग केला. ट्रॅक्टरने निंबाच्या झाडाला धडक दिल्याने तो पलटी झाला. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, चालक घटनास्थळावरून फरार झाला आहे.

घटना दिनांक ४ ऑगस्ट रोजी रात्री १२:३० वाजता उघडकीस आली.खोलापूर पोलीस




स्टेशनचे ठाणेदार सुलभा राऊत यांनी पथकासह घटनास्थळी धाव घेत, वाळूने भरलेला ट्रॅक्टर ट्रॉलीसह जप्त केला. ट्रॅक्टरचा क्रमांक चक ३३ त ४०६२ असून, याबाबत महसूल विभागाला लेखी पत्राद्वारे कळवण्यात आले आहे.महसूल विभागाच्या पंचनाम्यानंतर ३५ वर्षीय महिला मंडळ अधिकारी यांच्या तक्रारीवरून अज्ञात आरोपीविरोधात खालील कायद्यांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे:खोलापूर पोलीस पुढील तपास करीत असून, फरार आरोपीचा शोध घेतला जात आहे. वाठोडा परिसरात वाढत असलेल्या वाळू तस्करीच्या घटनांमुळे प्रशासन सतर्क झाले असून, कारवाईला गती देण्यात येत आहे.

## सर्वोच्च न्यायालयात सरकार पक्षकार होणार, महादेवीला पुन्हा आणण्यासाठी मोठा निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५कोल्हापूर**

कोल्हापूरकरांच्या भावना पुन्हा एकदा महादेवी हत्तीणीच्या तीव्र झाल्या आहेत. आता ही लढाई थेट सर्वोच्च न्यायालयात गेली आहे. महादेवी हत्तीणीला पुन्हा कोल्हापूरमध्ये आणण्यासाठी महाराष्ट्र सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. सरकार या प्रकरणात सरकार सर्वोच्च न्यायालयात पक्षकार होणार आहे. हा निर्णय नुकत्याच झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत घेण्यात आला. ही बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या समिती कक्षात पार पडली. बैठकीला कोल्हापूर जिल्ह्यातील आमदार, स्थानिक प्रतिनिधी, तसेच सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील काही आमदार उपस्थित



होते.

महादेवी ही हत्तीण अनेक वर्षांपासून कोल्हापूरमधील धार्मिक आणि सामाजिक वातावरणाचा भाग होती. मात्र काही वर्षांपूर्वी तिला वन्यजीव कायद्यानुसार 'वनतारा' या प्रकल्पात हलवण्यात आलं. हे स्थलांतर कोल्हापूरातील जनतेच्या भावनांवर आघात करणारे ठरलं. त्यामुळे महादेवीला पुन्हा कोल्हापुरात आणण्यासाठी स्थानिक नागरिक आणि कार्यकर्ते रस्त्यावर उतरले.

या पार्श्वभूमीवर सरकारवर जनतेचा दबाव वाढत चालला होता. मात्र, यात काही कायदेशीर अडचणी आणि वन्यजीव कायद्याचे बंधन असल्याने यावर निर्णय घेणं सरकारसाठी सोपं नव्हतं. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी थेट बैठक बोलावून या प्रकरणावर ठोस भूमिका घेतली.

## संपादकीय ......

# गुजरातने महाराष्ट्राची माधुरी हत्तीण पळवली

२०१४ साली केंद्रात नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भाजपची बहुमताची सत्ता आपल्यानंतर पुरोगामी आणि प्रगत महाराष्ट्रातील महत्वपूर्ण आणि विकासपुरक गोष्टी गुजरातला हलवण्याचा सपाटा चालवलेला दिसत आहे. त्यातून आता कोल्हापूरकारांशी जीवाभावाचे नाते निर्माण झालेली महादेवी हत्तीणही सुटलेली नाही. शक्ती, संतुलन आणि विवेक याचं उदाहरण म्हणून निसर्गात हत्तीचा सन्मान केला जातो. हिंदू परंपरेत हत्तीला देवाचा प्रतिनिधी म्हणून पाहिले जाते तर बौद्ध परंपरेत हत्तीचा बोधिसत्व म्हणून सन्मान केला जातो. सांचीच्या अशोक स्तंभावर सिंहासोबतच बैल आणि घोडा असून या ठिकाणी हत्तीलाही स्थान आहे. शक्ती, सामर्थ्याचे प्रतीक असलेला हत्ती हिंसेच्या विरोधात असताना त्याच्या सुळ्यांचा उपयोग तो स्वत:सह कमकुवतांच्या संरक्षणासाठी करत असल्याची धारणा आहे. हत्ती गवतभक्षी असल्याने त्यापासून कोणत्याही प्राण्याला कोणताही धोका नाही. तर हत्ती हे नैसर्गिक परिपूर्णतेचे संपूर्ण लक्षण मानले जाते. बौद्ध कथा परंपरेतील हत्ती आणि आंधळ्यांची कथा आपणास माहीत असते, हत्तीच्या विविध अवयवांना स्पर्श केलेल्या अंधांकडून हत्तीचे वेगवेगळे वर्णन केले जाते. हत्तीच्या पायांना स्पर्श केलेल्या अंधासाठी हत्ती स्तंभासारखा मोठा मजबूत असतो, तर हत्तीच्या कानांना स्पर्श केलेल्यांसाठी हत्ती हा ढाळली जाणारी चवरी किंवा धान्य पाखडण्याच्या सूपासारखा वाटतो. शेपटाला स्पर्श करणार्या अंधासाठी हत्ती रश्शीसारखा असतो तर सोंडेला स्पर्श करणार्यासाठी हाच हत्ती एखाद्या अजगरासारखा भासतो. एकाच गोष्टीबाबत माणसांमध्ये वेगवेगळे दृष्टिकोन असू शकतात, एकाच घटनेविषयी माणसांची वेगवेगळी मते, धारणा असू शकतात, ही मते किंवा धारणा म्हणजे संपूर्ण हत्ती नाही, हत्तीविषयी आपापल्या परीने केलेले आकलन आहे. हत्ती ही वस्तुस्थिती असताना त्याविषयी असलेले समज आणि गैरसमज या मानवी मनाने केलेल्या कल्पना असल्याचेही स्पष्ट व्हावे, हत्तीच्या जागेवर व्यक्ती, समाज, धर्म, विचारसरणी, इतिहास, शास्त्र, विज्ञान, जीवन, निसर्ग, तत्वज्ञान अशा कोणत्याही घटकांना ठेवून या कथेचा संदर्भ लक्षात घेता येतो.

कोल्हापुरातील महादेवी हत्तीणीविषयी सरकार, पेटा, कोल्हापूरमधील रहिवासी यांचेही असेच वेगवेगळे संदर्भ आणि मते समोर आली आहेत. महादेवीला परत कोल्हापूरमध्ये आणण्यासाठी नांदणीपासून कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत महादेवीवर प्रेम करणार्या नागरिकांनी आत्मक्लेश मूक पदयात्रा आयोजित केली. तर काँग्रेसचे विधान परिषदेतील गटनेते आमदार सतेज पाटील यांनी महादेवीला कोल्हापूरमध्ये परत आणण्यासाठी सह्यांची मोहीम राबवण्यास सुरुवात केली आहे. मागील ३० वर्षांपासून शिरोळ तालुक्यातील नांदणी येथील स्वस्तिश्री जिनसेन भट्टारक पट्टारक संस्थान मठात माधुरी ऊर्फ महादेवी हत्तीण राहात होती, ती नांदणीत ठिकाणी गुण्यागोविंदाने नांदत होती, असे कोल्हापूरकरांचे म्हणणे आहे. तर मागील सोमवारी न्यायालयाच्या निर्णयामुळे महादेवीला गुजरातमध्ये वनतारा येते रवाना करण्यात आले. महादेवीच्या रवानगीच्या विरोधात मठाने केलेली याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळल्याने महादेवीची गुजरातला रवानगी केली, मात्र कोल्हापूरची ओळख झालेल्या महादेवीला पुन्हा स्वगृही आणण्यासाठी कोल्हापूरकरांनी सुरू केलेल्या चळवळीचे स्वागत होत आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात राष्ट्रपतींच्या नावे निवेदन देऊन महादेवी हत्तीण परत आणण्याची मागणी नागरिकांनी केली. नांदणीत महादेवीची सेवा सुश्रूषा योग्य प्रकारे होत नसल्याचा आरोप करत प्राणी प्रेमी संघटनेने महादेवीला गुजरातच्या वनताराकडे सुपूर्द करण्याची मागणी केली होती. महाराष्ट्र आणि कर्नाटकातील देवस्थान आणि मठातील सर्व हत्ती वनताराला नेण्याचा हा डाव असल्याचा आरोप राजू शेट्टी यांनी केला आहे. तर महादेवीला परत आणण्यासाठी राज्यातील मंत्री आबिटकर यांनी 'सरकार कायदेशीर प्रक्रिया करून महादेवीला पुन्हा महाराष्ट्रात घेऊन येईल' असे आश्वासन दिले आहे.वनविभागाच्या परवानगीशिवाय महादेवीचा मिरवणुकीसाठी वापर केला जात आहे. तिला साखळ्यांनी बांधून ठेवल्याने तिच्या पायांना गंभीर इजा झाल्याचा आरोप करत वन्यजीवांच्या संरक्षणासाठी काम करणार्या संघटना न्यायालयात गेल्या. त्यानंतर मुंबई उच्च न्यायालयाने डिसेंबर २०२४ मध्ये महादेवीच्या आरोग्य आणि कल्याणासाठी तिला गुजरातमधील वनतारा पशु कल्याण केंद्रात हलवण्याचा आदेश दिला. यासाठी प्राण्यांच्या हक्कांना प्राधान्य देण्याचे निरीक्षण नोंदवले गेले. नांदणी मठाने या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले, परंतु सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाचा निर्णय कायम ठेवला. या सर्व घडामोडीत महादेवीची मोठी हेळसांड होत आहे. कोल्हापुरात महादेवीची काळजी घेतली जात नसल्याने तिला गुजरातमध्ये नेण्यावर भर देणार्यांनी मागील ३० ते ३५ वर्षे किंवा त्याहून अधिक वर्षापासून महादेवीची काळजी कोल्हापूरमध्येच घेतली जात होती, हे समजून घ्यायला हवे. याचिकाकर्त्यांच्या हेतूवर संशय नाही, परंतु महादेवी कोल्हापुराच्या शिरोळ नांदणीतही सुखाने नांदू शकते. महादेवीच्या स्थलांतरासाठी आग्रही असणार्यांनी महादेवीच्या मनाच्या आरोग्याचा विचार करायला हवा. कोल्हापूरमध्येच महादेवीला ठेवताना तिची जबाबदारी असलेल्यांना सूचना करणे, महादेवीच्या औषधोपचाराची सुविधा करणे, त्यासाठी पुरेशी व्यवस्था करता येणे शक्य आहे. कोल्हापूरमध्येही तिच्या आरोग्यावर चोख लक्ष ठेवता येऊ शकते, त्यासाठी तिच्या स्थलांतराची गरज नाही. महादेवीचे कोल्हापुरातील सांस्कृतिक, धार्मिक महत्व आणि तिच्या स्थलांतराच्या मुद्द्यावरून होणारे राजकारण, भावनिकता, कायदेशीर आग्रह बाजूला ठेवायला हवा. महादेवीच्या शारीरिक आरोग्यासोबतच तिच्या मनाचाही विचार व्हायला हवा. याबाबत कथेतल्या अंधांचे अंदाज कामाचे नाहीत. नांदणीतच महादेवीचे मन नांदत असेल तर त्याचाही विचार व्हायला हवा.

# डाळिंब बागेत अन्न द्रव्य व्यवस्थापन कसे करावे, कुठली खते द्यावीत, वाचा सविस्तर

**दि.५विदर्भ प्रजासत्ताक–** डाळिंब पिकात आंबिया बहार धरणे अधिक चांगले मानले जाते. कारण यामध्ये किड आणि रोगाचे प्रमाण कमी असते आणि एक महत्वाची गोष्ट, ज्यांच्याकडे पाणी मुबलक प्रमाणात आहे, त्यांनी तर आंबिया बहार अवश्य घेतला पाहिजे. या काळात अन्न द्रव्य व्यवस्थापन कसे करावे, हे समजून घेऊयात...




शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

सध्या डाळिंब बागेमध्येफळे वाढीच्या अवस्थेत आहेत. त्यामुळे फांद्यावर फळांचा भार आल्याने वाकलेल्या फांद्यांना आधार देणे गरजेचे आहे. त्यासाठी बांबूने ताणलेल्या तारेला सुतळीने बांधाव्यात किंवा परिस्थितीनुसार जी.आय. किंवा एम.एस. स्ट्रक्चरला बांधाव्यात.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

अन्नद्रव्य व्यवस्थापन

जिप्सम ६४० ग्रॅम आणि मॅग्नेशिअम सल्फेट ४०० ग्रॅम प्रति झाड जमिनीत पूर्णपणे मिसळून द्यावे.

त्यानंतर पाणी द्यावे.

सिंचनाद्वारे आठवड्याच्या दिवसांच्या अंतराने आठवेळा पुढीलप्रमाणे खते द्यावीत.

(प्रमाण प्रति एकर प्रति वेळ) युरिया १६.५ ते २८ किलो ०–५२–३४ ९ किलो आणि ०–०–५० ९ किलो

फवारणीद्वारे १० दिवसांच्या अंतराने पुढील खते द्यावीत.

(प्रमाण प्रति लिटर पाणी) ०–५२–३४ ५ ते ६ ग्रॅम या प्रमाणे तीन फवारण्या आणि मँगेनीज सल्फेट ६ ग्रॅम या प्रमाणे दोन फवारण्या कराव्यात.

– ग्रामीण कृषी मौसम सेवा आणि विभागीय संशोधन केंद्र, इगतपुरी.




# पालक–पनीर खाताय? आरोग्यावर होणारे दुष्परिणाम जाणून धक्काच बसेल

**दि.३विदर्भ प्रजासत्ताक**

आपल्या रोजच्या आहारात पनीर हा एक पोषक आणि चविष्ट पदार्थ मानला जातो. तसंच पालकसुद्धा शरीरासाठी उपयुक्त असणाऱ्या हिरव्या पालेभाज्यांपैकी एक. यामध्ये लोह, अँटीऑक्सिडंट्स, फायबर्स यांसारखे घटक भरपूर प्रमाणात असतात. त्यामुळे पालक आणि पनीर यांचे कॉम्बिनेशन म्हणजे आरोग्यदायी डिश, असा समज अनेकांचा असतो. विशेषतः पालक पनीर हे डिश अनेक घरांमध्ये लोकप्रिय आहे.

मात्र, अलीकडील संशोधन आणि आहारतज्ज्ञांच्या निरीक्षणानुसार पालक आणि पनीर एकत्र खाणं शरीरासाठी फायदेशीर नसून हानिकारक ठरू शकतं.

**पनीरमध्ये कॅल्शियम, पालकमध्ये लोह पण एकत्र खाणं चुकीचं का?**

आहारतज्ज्ञ सांगतात की, पनीरमध्ये भरपूर प्रमाणात कॅल्शियम असते, तर पालकामध्ये लोहाचे प्रमाण जास्त असते. या दोन्ही घटकांची शरीराला गरज असली तरी ते एकत्र खाल्ल्यास एकमेकांमध्ये अडथळा ठरतात. कारण शरीर एकाच वेळी लोह आणि कॅल्शियम शोषू शकत नाही. याचा परिणाम असा होतो की दोन्ही घटक शरीरात योग्य प्रमाणात शोषले जात नाहीत आणि फायदेशीर ठरण्याऐवजी पचनाच्या समस्या निर्माण करतात.

**पचनसंस्थेवर होणारा परिणाम**

पालक–पनीर हे डिश खाल्ल्यावर काही लोकांना ॲसिडिटी, गॅसेस, डायरिया किंवा बद्धकोष्ठतेसारख्या समस्यांचा अनुभव येतो. कारण कॅल्शियम आणि लोहाचे एकत्रित सेवन केल्यावर पचनसंस्था त्यावर योग्य प्रक्रिया करू शकत नाही. यामुळे पचनसंस्थेवर ताण येतो.

**शरीरातील लोह शोषणावर परिणाम–** शरीरात लोहाची कमतरता झाली, तर हिमोग्लोबिनचे प्रमाण घटते, थकवा येतो, अशक्तपणा जाणवतो. पालक खाणं फायद्याचं असलं तरी जर त्यासोबत पनीर सारखा



कॅल्शियमयुक्त घटक घेतला, तर लोह योग्य पद्धतीने शोषले जात नाही. विशेषतः ज्या व्यक्तींना आयर्न डिफिशियन्सी आहे, त्यांनी हे कॉम्बिनेशन टाळावं.

**किडनी स्टोनचा धोका वाढतो**

हे फारसं कुणाला माहीत नसेल, पण पालकामध्ये ऑक्सॅलिक ॲसिड असते, जे पनीरमधील कॅल्शियमसोबत प्रतिक्रिया देऊन कॅल्शियम ऑक्सॅलेट क्रिस्टल्स तयार करू शकते. हे क्रिस्टल्स म्हणजेच किडनी स्टोनचे मुख्य कारण ठरतात. ज्यांना मूत्रपिंडाच्या (किडनीच्या) तक्रारी आहेत, त्यांनी हे कॉम्बिनेशन टाळावं.पालक पनीर ही भाजी चवदार आणि लोकप्रिय असली, तरी आरोग्याच्या दृष्टिकोनातून विचार केल्यास ती नेहमी खाणं टाळणं योग्य ठरेल. पनीर आणि पालक दोघेही वेगवेगळ्या वेळेला खाल्ले, तर त्यांचे फायदे शरीराला जास्त चांगल्या प्रकारे मिळू शकतात. जेवणात पोषण असावं लागतं

# जिल्ह्यात पिकपेरा नोंदणीला सुरुवात

## शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, एक ऑगस्ट ते १४ सप्टेंबरपर्यंत मुदत

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५तिवसा–** जिल्ह्यात गेल्या चार वर्षांपासून मोबाइलवर ई–पीक पाहणी ॲपवर शेतातील पीकपेऱ्याची नोंदणी केली जात आहे. यंदाही एक ऑगस्टपासून ही नोंदणी सुरू झाली असून पीकपेऱ्याच्या आधारे शेतकऱ्यांना प्रधानमंत्री पीकविमा योजनेअंतर्गत मिळणारी मदत, ओला दुष्काळ मदत, पीक कर्जवाटप, नैसर्गिक आपत्तीमुळे झालेले पिकांचे नुकसान, कीड व रोग यामुळे झालेले नुकसान या सर्वांसाठी पीकपेऱ्याची नोंद महत्त्वाची ठरणार आहे. यासाठी सर्व शेतकरी बांधवांनी ई–पीकपाहणी ॲपद्वारे आपल्या पिकांची नोंद करून घ्यावी, असे आवाहन तिवसा तालुका कृषी अधिकारी हेमलता इंगळे यांनी केले आहे. सोबतच ॲग्रीस्टाक फॉर्मर आयडी काढून घेण्याचे आवाहन करत आहे.

राज्य सरकारच्या भूमिअभिलेख व जमाबंदी आयुक्तालयाने ऑगस्ट २०२१ मध्ये शेतकरी पातळीवर पिक नोंदणीसाठी ई–पीक पाहणी ॲप उपलब्ध करून दिले आहे. त्यामुळे सातबारा उताऱ्यावर पिकांची नोंद करण्यासाठी तलाठ्यांकडे न जाता शेतात जाऊन



स्वतःच पिकांची नोंद करता येते. पीकपेऱ्याची नोंद करण्याचा कालावधी हा एक ऑगस्ट ते १४ सप्टेंबर, असा आहे. भूमिअभिलेख विभागाने आता ई–पीक पाहणीचे नवीन सोपे व्हर्जन ३ आणले आहे. या ॲपमुळे शेतकऱ्यांना ई–पीकपाहणी केल्यानंतर काही सुधारणा करावयाची असल्यास ४८ तासांत दुरुस्ती करता येणार आहे. शेतकऱ्यांनी पीक पाहणी अपलोड केल्यापासून ४८ तासांमध्ये जर शेतकऱ्यांना काही दुरुस्ती किंवा नोंदविलेली पीक पाहणी रद्द करायची असेल तर मोबाईल ॲप मधून ४८ तासांच्या आत दुरुस्ती किंवा नष्ट करण्याची सुविधा उपलब्ध आहे. सातबारावर प्रतिबिंबित झालेल्या पीक पाहणीमध्ये दुरुस्ती करावयाची असेल तर, हंगाम संपायच्या आधी मंडळ अधिकारी यांचेकडे अर्ज द्या. ॲपसाठी सुरवातीला आपल्याला गुगल प्ले स्टोअरवर जाऊन पीकपाहणी व्हर्जन ३ डीसीएस असे डाउनलोड केल्यावर शेतकऱ्यांना पहिले आपला जिल्हा निवड करायचा आहेत. शेतकरी म्हणून लॉगिन करून आपला मोबाईल नंबर टाकायचा आहे. सातबारावर जे नाव आहे से टाकून आलेला ओटीपी टाकून लॉगिन करायचे आहे. आपण आपल्या शेतीची आवश्यक पीकक्षेत्र माहिती, पिकांचे नाव आणि इतर माहितीची नोंदणी करावयाची आहे. त्यामुळे आपल्या राज्यात कोणत्या पिकाखाली किती क्षेत्र आहे, कोणत्या जिल्ह्यात, तालुक्यात, गावात कोणते प्रमुख पीक आहे, याची माहिती मिळणे सुलभ झाले आहे. पीक नोंदणीसाठी १४ सप्टेंबरपर्यंत मुदत दिलेली आहे. त्यामुळे जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी आपल्या पिकाची ई–पीकपाहणी ॲपवर नोंदणी करण्याचे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

> नुकसानग्रस्त पिकांच्या भरपाईसाठी सर्व शेतकरी बांधवांनी ई–पीकपाहणी ॲपद्वारे आपल्या पिकांची नोंद करून घ्यावी व आपले पीक सुरक्षित करावे. –
>
> **संजय भालेराव**
> **तालुका कृषी अधिकारी, तिवसा.**
>
> पीक नोंदणीसाठी १४ सप्टेंबरपर्यंत मुदत दिलेली आहे. त्यामुळे जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी आपल्या पिकांची ई–पीक पाहणी ॲपवर नोंदणी करावी. मोबाईल मध्ये आवश्यक इंटरनेट डेटा आणि इंटरनेट कव्हरेज महत्वाचे आहे. जीपीएस सेटिंग सुरू असणे आवश्यक आहे. पिकांचा फोटो जवळून घ्यावा व पूर्ण माहिती अपलोड करावी.
>
> **निखिल तेटू, कृषी अभ्यासक,**
>
> पिकांची नोंदणी झाल्यास कर्ज लवकर मिळते तसेच पिकांचे नुकसान झाल्यास लवकरच पीकविमा ॲपवर जाऊन तक्रार करता येते. एका वेळेस अनेक शेतकऱ्यांच्या पिकांची नोंदणी आपल्या मोबाईलमधून करता येते. सातबारामध्ये किती क्षेत्र पेरणीसाठी योग्य आहे हे दाखविले जाते. अशा संपूर्ण गोष्टीची माहिती आज ई–पीकपाहणी ॲपमधून सर्व शेतकऱ्यांना होत आहे. त्यामुळे पिकांची नोंदणी सर्वांनी करावी.
>
> **संजय दारोकार शेतकरी**

# श्रावण सोमवारी स्त्रीशक्तीच्या भक्तिवारीने लासूर तीर्थक्षेत्र भक्तिमय

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४ ५लासूर –** श्रावण महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी तीर्थक्षेत्रावर महिलांची पारंपरिक वारी भक्तिभावात संपन्न झाली. साडीत नटलेल्या, टाळ–मृदुंगाच्या गजरात हरिनाम घेणाऱ्या ज्योती चतुर्भुज, शोभा पाटणे, गुजर, रंजना लेंडे, पुष्पा वानखडे, आदी भगिनींनी लासूर मंदिरात परिसरात भक्तिरस फुलवला. काहींनी डोक्यावर कलश घेतले तर काहींनी भगवान शंकराची पालखी मिरवली. हर हर महादेवच्या जयघोषात संपूर्ण वातावरण आध्यात्मिकतेने भारावले.वरील वारी श्रध्दा व विश्वास समितीच्या पुढाकाराने झाली. वारीनंतर सामूहिक आरती, हरिपाठ . अशा वाऱ्या श्रद्धा, निष्ठा आणि सामाजिक एकतेचे प्रतीक ठरत आहेत. वारीचे दिशादर्शक मार्गदर्शक सेवानिवृत्त प्रा.सुभाष चतुभुज, प्रा.लेंडे यांनी सेवा दिली.



# खासदार वानखडे आणि काँग्रेस जिल्हाध्यक्षांनी जखमी विद्यार्थिनींची रुग्णालयात घेतली भेट

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५अचलपूर**

चिखलदरा तालुक्यातील नागापूर येथील आदिवासी आश्रम शाळेत दुर्दैवी घटना घडली. पाण्याच्या टाकीची भिंत कोसळून एका विद्यार्थिनीचा मृत्यू झाला आणि तीन विद्यार्थिनी गंभीर जखमी झाल्या.

खासदार बळवंतराव वानखडे आणि काँग्रेस जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांनी रुग्णालयात जाऊन जखमी विद्यार्थिनी आणि त्यांच्या नातेवाईकांची भेट घेतली. त्यांनी विद्यार्थिनींची प्रकृती जाणून घेतली आणि त्यांच्या कुटुंबियांशी संवाद साधला.भेटीदरम्यान दोन्ही नेत्यांनी उपस्थित शिक्षकांकडून संपूर्ण घटनाक्रमाची माहिती घेतली. त्यांनी डॉ. रावत यांना मुलींच्या आरोग्याबाबत आणि प्रकृतीत सुधारणा होण्यासाठी आवश्यक ती सर्व काळजी



घेण्याच्या सूचना दिल्या.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब – पोर्टल /ई – पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

मंगळवार दि. ५ ऑगस्ट २०२५

शहर/ग्रामिण


# १४ ऑगस्टला सर्व शाळांमध्ये पसायदानाचे पठण

## शिक्षण संचालकांचे शिक्षणाधिकाऱ्यांना पत्र, शासनाचा उपक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती–** सन २०२५ वर्ष हे संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली यांच्या ७५० व्या जयंतीचे वर्ष आहे. यानिमित्ताने संत ज्ञानेश्वर माऊलींचा पसायदानाच्या माध्यमातून दिलेला विचार राज्यातील प्रत्येक शाळांमध्ये एकाचवेळी पोहचावा म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार येत्या १४ ऑगस्टला राज्यातील प्रत्येक शाळेत पसायदानाचे पठण करण्यात यावे, असे आदेश शालेय शिक्षण विभागाने शाळांना दिले आहेत. शिक्षण आयुक्त कार्यालयाकडून हे आदेश राज्यातील सर्व अनुदानित, विना अनुदानित, खासगी, महापालिका, जिल्हा परिषद, संस्थात्मक शाळांना कळविण्यात आले आहेत. १५ ऑगस्टला गोकुळ अष्टमीला संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊल यांची



७५० वी जयंती आहे. या दिवशी १५ ऑगस्ट निमित्त झेंडावंदन, प्रभातफेरीचे कार्यक्रम शाळांमध्ये असल्याने पसायदान पठणाचा कार्यक्रम १४ ऑगस्टला घेण्याचे शालेय शिक्षण विभागाचे आदेश आहेत.हे आदेश प्राप्त होताच राज्यातील शाळांनी १५ ऑगस्टच्या झेंडावंदनाच्या तयारी बरोबर सामुहिक पसायदान पठणाची जोरदार तयारी शाळांमध्ये सुरू केली आहे. काही शाळांनी यासंदर्भात आम्हाला अद्याप आदेश प्राप्त नाहीत. पण आदेश प्राप्त होताच शालेय शिक्षण विभागाच्या आदेशाचे पालन केले जाईल, असे सांगितले. तर, बहुतांशी शाळा संस्था संस्थापकांनी आम्ही आमच्या शाळेत नियमित पसायदान, मनाचे श्लोक, संस्कृतीशी निगडित मुलांवर संस्कार करणाऱ्या प्रार्थना, राष्ट्रभक्तीपर गीतांचे सामुदायिक पठण करत असतो, असे सांगितले. शालेय शिक्षण विभागाच्या आदेशानुसार आम्ही १४ ऑगस्टला हा कार्यक्रम घेऊ, असे सांगितले.पसायदानातून संत ज्ञानेश्वर महाराजांनी विश्व कल्याणाचा विचार मांडला आहे. हा विचार शालेय जीवनापासून विद्यार्थ्यांना कळावा, हाही या उपक्रमा मागील उद्देश आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २९ जुलै रोजी दिलेल्या या निर्देशाप्रमाणे शालेय शिक्षण विभागाचे उपसचिव तुषार महाजन यांनी ३१ जुलै रोजी शालेय शिक्षण आयुक्तांना पत्र लिहून मुख्यमंत्र्यांच्या निर्देशाचे पालन करण्याचे आदेश दिले आहेत.

मागील दोन महिन्यांपासून राज्यांमधील शाळांमध्ये तिसरी भाषा म्हणून हिंदी सक्तीच्या विषयावरून जोरदार राजकीय घमासान सुरू होते. या हिंदी सक्तीच्या विषयावरून उलटसुलट आरोप प्रत्यारोप झाल्यामुळे राज्य सरकारला हिंदी सक्तीचा विषय रद्द करावा लागला होता. यावरून विरोधकांनी जल्लोष केला होता.

### ७५० व्या जयंतीनिमित्त आयोजन

३ जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये पसायदान म्हटले जाते. परंतु ज्ञानेश्वर महाराजांच्या ७५० व्या जयंतीनिमित्त राज्य शासनाचे आदेश असल्यामुळे सर्व शाळांमध्ये पसायदान गायले जाणार आहे.– **सतीश मुगल, शिक्षणाधिकारी जि.प.**

### सर्व शाळांना सूचना

महानगरपालिकेच्या ६३ व खाजगी २०७ सर्व शाळांमध्ये पसकाच्या ६३ कखाजगीर आहे. एक ऑगस्ट रोजी शाळांमध्ये पसायदान पठण करण्यात येणार असून शिक्षण संचालकांकडून प्राप्त झालेले आदेश सर्व मुख्याध्यापकांना पाठवण्यात आले आहे. – **प्रकाश मेश्राम, शिक्षणाधिकारी मनपा.**

# सालबर्डी ते वडरपुरा कावड यात्रेचे उत्साहात आगमन

## भक्तिमय वातावरणात शिवभक्तांचा जल्लोष



**विदर्भ प्रजासत्ताकदि.५ अमरावती** श्रावण महिना आणि लावणी सोमवारच्या निमित्ताने बहरपुण येथील जय बजरंग युवा मंडळाने सालबर्डी ते बहरपुरा कावड यात्रा काइली. सोमवारी (ता. चार) बडरपुरा येथे शिव मंदिरांत जलवाहून कावड यात्रेचा समारोप करण्यात आला. 'हर हर महादेव' आणि 'बम बम भोले च्या जयघोषात शेकडो शिवभक्त या यात्रेमध्ये सहभागी झाले होते.

वडरपुरा येथील शिवमक्तांनी सालबर्डी येथील माडू नदीतून कलशात जल भरून यात्रेची सुरुवात केली. ही यात्रा शहरातून परिक्रमा करून वडरपुरा येथील महादेव मंदिरात पोहोचली.

तेथे भाविकांनी शिवलिंगावर जलाभिषेक करून दर्शन घेतले. या यात्रेत मोठ्या संख्येने शिवभक्त सहभागी झाले होते. यात्रमध्ये महिलांचाही सहभाग मोठ्यां प्रमाणात दिसून आला.

यावर्षीच्या कावड यात्रेमध्ये महादेव तसेच हनुमान यांच्या भव्य मुर्त्या, पिंड विशेष देखावा दिसून आला. यात्रेचा समारोप मंदिरांमध्ये जलाभिषेक आणि आरतीने करण्यात आला. या कावड यात्रांमुळे वडरपुरा परिसरात भक्तिमय आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

कवडयात्रेच्या यशस्वीतेसाठी भाजप शक्ती केंद्रप्रमुख अजय मुधोळकर, सामाजिक कार्यकर्ता विनोद मुधोळकर, रोहन पवार,

कुणाल पवार, रोहित शिंदे, शिवा शेळके, कार्तिक शिंदे, रोशन जिरे, आनंद जिरे, सुनील देवकर, आर्यन देवकर, बंडू चौधरी, संतोष पवार, धनंजय पवार, कुंदन पवार, राधेश्याम पवार, राजू पवार, दिलीप पवार, सुखदेव मुधोळकर, रोशन पिटेकर, शामू पवार, अमोल पवार, अंगत जिरे यांच्यासह जय वडार युवक मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सहकार्य केले.

# पाच हजारांची लाच घेणाऱ्या अभियंत्यासह खासगी व्यक्तीला अटक

## चांदूररेल्वे पंचायत समिती येथील घटना

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५चांदुर रेल्वे–** पाच हजार रुपयांची लाच घेणाऱ्या अभियंत्यासह एका खाजगी व्यक्तीला लाचलुचपत विभागाच्या अधिकाऱ्यांनी सोमवारी दुपारी चांदूररेल्वे येथील पंचायत समिती येथून अटक केली. ग्रामीण गृहनिर्माण अभियंता राहुल रामकृष्ण नांदणे (वय ३०, रा. शेगाव रहाटगाव रोड, विघ्ने किराणा दुकानाजवळ अमरावती) आणि खासगी व्यक्ती प्रवीण भास्करराव धाडसे (वय ३८, रा. पळसखेड) अशी अटकेतील लाच घेणाऱ्यांची नावे आहेत.



तक्रारदार व त्यांच्या वडिलांना घरकुल बांधण्यासाठी मिळणाऱ्या दुसऱ्या टप्प्याचे प्रत्येकी ७० हजार रुपये मंजुर झाले होते. तसेच दुसऱ्या टप्प्याचे पैसे तक्रारदार व त्यांच्या वडिलाच्या खात्यात जमा करण्याकरिता अभियंता नांदणे याने ५ हजार रुपयांची लाच तक्रारदाराला मागितली होती. त्यामुळे त्यांनी सोमवारी लाचलुचपत विभागाकडे तक्रार दिली. त्या आधारावर पोलिसांनी पडताळणी केली असता अभियंता नांदणे याने खासगी व्यक्ती प्रवीण धाडसेजवळ ५ हजार रुपये देण्यास सांगितल्याचे स्पष्ट झाले.लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने चांदूररेल्वे पंचायत समिती परिसरात सापळा रचला आणि ठरल्याप्रमाणे तक्रारदाराने धाडसेजवळ पाच हजार रुपये दिले.त्याचवेळी अधिकाऱ्यांनी धाडसे व अभियंता नांदणे याला अटक करुन चांदूररेल्वे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. याकारवाईत पोलीस उपअधीक्षक सुनील किनगे, पोलीस निरीक्षक चित्रा मेसरे, सुजाता बन्सोड, पोलीस अंमलदार प्रमोद रायपुरे, शैलेश कडू, महेंद्र साखरे आणि सतीश किटुकले यांचा समावेश होता.

# अमरावती महानगरपालिकेची गुलिस्तान नगर, महाविर कॉम्प्लेक्स व मोरबाग येथे प्लास्टिक जप्तीची मोठी कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती–**

महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या निर्देशानुसार आणि उपायुक्त डॉ. मेघना वासनकर यांच्या मार्गदर्शनाखाली गुलिस्तान नगर, मोरबाग, महाविर कॉम्प्लेक्स परिसरात प्लास्टिक जप्तीची मोठी धडक कारवाई करण्यात आली. महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाने राबवलेल्या या विशेष मोहिमेत मोठ्या प्रमाणावर प्रतिबंधित प्लास्टिक साहित्य जप्त करण्यात आले. शासनाच्या प्लास्टिक बंदी धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणी साठी ही कारवाई अत्यंत महत्त्वाची मानली जात





आहे.कारवाई दरम्यान अब्दुल सलाम अब्दुल सत्तार रा.गुलिस्तानगर यांच्याकडे एकुण १५ पोते अंदाजित ५० किलो, पवन कुकरेजा महाविर मार्केट यांच्याकडे एकुण १९ पोते अंदाजित ३०० किलो, रतन खत्री मोरबाग यांच्याकडे एकुण ३२ पोते अंदाजित २५० किलो प्लास्टिक साहित्य आढळून आले व तपासणीसाठी जप्त करण्यात आले. महानगर पालिकेने सर्व नागरिक व व्यापाऱ्यांना पुन्हा आवाहन केले आहे की, पर्यावरणपूरक पर्यायांचा अवलंब करावा व प्लास्टिक बंदीचे काटेकोर पालन करावे. नियम भंग करणाऱ्यांवर भविष्यात आणखी कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही मनपा प्रशासनाने दिला आहे.या कार्यवाहीत वैद्यकीय अधिकारी डॉ.अजय जाधव, पशुशल्य चिकीत्सक डॉ.सचिन बोंद्रे, पोलीस विभागाचे अधिकारी संयोनी इमरान नायकवडे, पर्यावरण विभागाचे अधिकारी जितेंद्र पुंडसे, मध्य झोन क्र.२ चे सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, बाजार व परवाना विभागाचे सहाय्यक आयुक्त दिपक खडेकार, उदय चव्हाण, अतिक्रमण विभागाचे अतिक्रमण पथक प्रमुख योगेश कोल्हे, अग्निशमन विभागाचे अधिकारी संतोष केंद्रे, नोडल अधिकारी विकी जेधे, स्वास्थ निरीक्षक प्रशांत गावनेर, मनपा कर्मचारी उपस्थित होते.

# कपाशी, सोयाबीनला फटका, क्षेत्रात ३५ हजार हेक्टरने घट

## पिकांचे नुकसान, उत्पादनात कमी, दर न मिळाल्याचा बसला फटका

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती :** उत्पादन खर्च वाढला असताना सोयाबीन व कापसाला वर्षभर न मिळालेला हमीभावाचा थेट फटका यावर्षी पेरणी क्षेत्राला बसला आहे. या दोन्ही पिकांचे क्षेत्र गतवर्षीच्या तुलनेत यंदा तब्बल ३५,२३९ हेक्टरने कमी झाले आहे. याउलट



तुरीचे क्षेत्र ७,३८८ हेक्टर व मक्याचे २१,६३७ हेक्टरने वाढल्याचे वास्तव आहे.

गतवर्षीच्या खरीप हंगामात सोयाबीन २,६१,४२७ हेक्टर व कपाशीचे २,५२,५५१ हेक्टर क्षेत्र होते. त्या तुलनेत यंदा सोयाबीन २,४३,४७३ हेक्टर व कपाशीचे २,३५,२६६ हेक्टर क्षेत्र आहे. या दोन्ही पिकांच्या पेरणी क्षेत्रात यावर्षी घट आलेली आहे.यामध्ये सर्वाधिक १७,९५४ हेक्टरची घट कपाशीत, तर सोयाबीनचे क्षेत्र यंदा १७,२८५ हेक्टरने कमी झालेले आहे. शासन खरेदीत अटी व शर्तीचा भरणा, तसेच केंद्रांवरील गोंधळ याशिवाय दोन–तीन महिने न मिळणारे पेमेंट, मजुरांचा तुटवडा यामुळे शेतकरी त्रस्त आहेत. भाववाढीसाठी साठवणूक करावी तर वजनात घट येत असताना, दरातही वाढ झालेली नाही. त्यामुळे साठवणूक हा तोट्याचा पर्याय यावेळी ठरला आहे.शिवाय सोयाबीनवर कीड व रोग, तसेच काढणीपश्चात नुकसान होते, तर कपाशीवर बोंडअळीचा अटॅक यामुळे पेरणी क्षेत्रात कमी आलेली आहे. त्यामुळे अन्य पिकांची क्षेत्रवाढ झालेली आहे.

### मूग, उडीद, ज्वारी क्षेत्रातही कमी : केवळ कपाशी व सोयाबीनचेच

पेरणी क्षेत्र कमी झालेले नाही, तर गतवर्षीच्या तुलनेत मूग, उडीद व ज्वारी क्षेत्रात यावर्षी कमी आलेली आहे. अल्पावधीचे पीक असणाऱ्या मूग व उडदाना कमी पावसाचा फटका बसतो, तर ज्वारीला भाव मिळत नाही. त्यातुलनेत मका लागवड फायद्याची ठरत असल्याने या सर्व पिकांच्या क्षेत्रात कमी आलेली आहे.

### गतवर्षी व यंदाचे पेरणी क्षेत्र (हेक्टर)

| पीक | कपाशी | सोयाबीन | तूर | मका |
|---|---|---|---|---|
| २०२४ | २,५२,५५१ | २,६१,४२७ | १,०७,९९८ | २३,२९४ |
| २०२५ | २,३५,२६६ | २,४३,४६३ | १,१५,३३६ | ४४,९३१ |

# पाचवी व आठवीतील विद्यार्थ्यांच्या नाव नोंदणीसाठी मुदतवाढ

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती** महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळामध्ये प्राथमिकस्तर इयत्ता पाचवी व उच्च प्राथमिकस्तर आठवीसाठी नव्याने प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांचे ऑनलाइन पद्धतीने नाव नोंदणी प्रवेश अर्ज स्वीकारण्यास मुदतवाढ देण्यात आली असून १४ ऑगस्ट ही अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत राहील, असे महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळाचे प्रभारी सचिव प्रमोद गोफणे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे. ऑनलाईन नाव नोंदणी अर्ज भरण्याचा व कागदपत्रे स्वीकारण्याबाबतचा तपशील पुढील प्रमाणे दि. १ ते १४ ऑगस्ट २०२५ या कालावधीत विद्यार्थ्यांनी



ऑनलाईन पद्धतीने नावनोंदणी अर्ज भरणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी मूळ अर्ज, विहित शुल्क व मूळ कागदपत्रे अर्जावर नमूद केलेल्या संपर्क केंद्र शाळेमध्ये दि. १९ ते २९ ऑगस्ट पर्यंत जमा करावे दि. ४ ऑगस्ट २०२५ पर्यंत संपर्क केंद्र शाळांनी विद्यार्थ्यांचे अर्ज विहित शुल्क, मूळ कागदपत्रे व विद्यार्थ्यांची यादी विभागीय मंडळाकडे जमा करावी. मुक्त विद्यालय मंडळाच्या इयत्ता पाचवी व आठवीसाठी प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांनी http://msbos.mh-ssc.ac.in संकेतस्थळाचा वापर करावा तसेच अर्ज भरतेवेळी संकेतस्थळावर दिलेल्या सूचनांचे पालन करावे, असेही मंडळाव्दारे कळविण्यात आले आहे.

# शिकाऊ उमेदवारांवर अन्याय? विद्युत सहाय्यक भरतीत १०% आरक्षण डावलल्याचा आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५ नंदगाव खंडेश्वर–** महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या कार्यकक्षेत विद्युत सहाय्यक पदाची पदभरती घेण्यात आली. या पदभरतीत शासन परिपत्रकात नमूद शिकाऊ उमेदवारांना १० टक्के आरक्षण न देता निवड यादी प्रकाशित करून शिकवू उमेदवारांवर अन्याय केल्याची तक्रार शिवसेनेचे प्रकाश मारोटकर यांच्या नेतृत्वात उमेदवारांनी जिल्हाधिकारी व बीज वितरण कंपनीच्या मुख्य अभियंत्यांकडे केली आहे.



महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने विद्युत सहाय्यक पदाची जाहिरात क्र.. ०६/२०२३ नुसार एकूण ५,३४७ विद्युत सहाय्यक पदाची पदभरती घेतली. पदभरतीची निवड प्रक्रिया राबविताना समानंतर आरक्षणांतर्गत जाहिरातीमध्ये नमूद संवर्गमध्ये तदर्थ मंडळ तथा महावितरण होल्डींग कपंनी यांच्या अधीपत्त्याखाली महावितरण, महानिर्मिती, महापारेषाण कंपनीमध्ये यशस्वीरित्या शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण पूर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थ्यांना १० टक्के आरक्षण देऊनजनरल श्रेणी व शिकाऊ उमेदवाराची श्रेणी अशा दोन श्रेणीत निवड यादी तयार करण्याचे स्पष्ट नमूद आहे. या पदभरतीतील सर्वच उमेदवारांना एकाच श्रेणीत घेतल्याने शिकाऊ उमेदवारांना १० टक्के आरक्षणाचा लाभ न देता त्यांना डावलण्यात आले आहे. तक्रारीनंतर जनरल श्रेणी व शिकाऊ उमेदवारांची श्रेणी अशी निवड यादी लावण्यात आली होती.त्यामुळे सदर निवडप्रक्रिया करून प्रसिद्ध केलेल्या निवड यादीला तात्पुरती स्थगिती देऊन १० टक्के आरक्षणाची श्रेणी लावून नव्याने निवडयादी प्रकाशित करावी, अशी मागणी शिकाऊ उमेदवारांनी वीज वितरण कंपनीचे अभियंता व जिल्हाधिकाऱ्यांना केली आहे. यावेळी पदभरतीतील उमदेवार गौरव निकोडे, शशिकांत चव्हाळे, वेदांत तीवसकर, मयूर नेवारे, गौरव केवट, अजय चौधरी, सूरज निकोडे, अनुप निकोडे, अनिकेत शेंडे, आशिष साखरे उमेदवार उपस्थित होते.

# शहरात २७ उद्याने; देखभालीकरिता ८४ लाखांचा खर्च:तरीही दुरावस्था,

# नागरिकांसाठी नाही एकही विरंगुळ्याचे ठिकाण चांगल्या स्थितीत

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५यवतमाळ –** गेल्या काही वर्षात झपाट्याने वाढत असलेल्या यवतमाळ शहराची लोकसंख्या आता तीन लाखांच्या घरात पोहचली आहे. इतक्या मोठ्या संख्येने नागरिक राहत असताना शहरातील नागरिकांना विकेंड ला परिवारासह फिरण्यासाठी जाता येईल असे एकही विरंगुळ्याच्या ठिकाणी यवतमाळ शहरात नाही. सायंकाळी फेरफटका मारण्यासाठी सुस्थितीत असलेले एखादे उद्यानही नाही. नावासाठी शहरात २७ उद्याने आहेत, त्यांच्या देखभालीसाठी वर्षाकाळी ८४ लाखांचा खर्चही करण्यात येतो. मात्र असे असताना त्या उद्यानांची दयनीय अवस्था झाल्याचे दिसून येते.



सध्याचे धकाधकीचे जीवनमान आणि बदलती जीवनशैली यामुळे एका घरात राहणाऱ्या चार माणसांना एकत्र येण्यासाठी आणि एकमेकांना वेळ देण्यासाठी सुटीच्या दिवसाखेरीज दुसरा कुठलाही दिवस मिळत नाही. त्यामुळे सुटीच्या दिवशी परिवारातील सर्व सदस्यांनी एकत्र येवून घराच्या बाहेर पडून काही वेळ घालवायचा ठरवल्यास त्यांना विरंगुळा म्हणून कुठे जाता येईल असे कुठलेही ठिकाणी यवतमाळ शहरात नाही. शहरात पूर्वी शिवाजी उद्यान आणि नेहरु उद्यान ही दोन मोठी अद्याने होती. त्या ठिकाणी सुटीच्या दिवशी शहरवासी विरंगुळा म्हणून वेळ घालवण्यासाठी जायचे. मात्र मागील काही वर्षात त्या उद्यानांचीही दयनीय अवस्था झालेली आहे. सध्या शहरात या दोन उद्यानांसह लहान मोठी अशी तब्बल २७ उद्याने असल्याची नोंद पालिकेच्या नियोजन विभागाकडे आहे. त्या उद्यानांच्या देखभालीसाठी या वर्षी ८४ लाख रुपये खर्च करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. दरवर्षी उद्यानांच्या देखभाल दुरूस्तीसाठी हा मोठा खर्च होत असताना उद्यानांची अवस्था आजही दयनीय झाली असल्याचे दिसते. त्यामुळे या उद्यानांमध्ये फीरण्यासाठी जाणेही शहरवासीयांना शक्य नाही.

### ■विरंगुळ्यासाठी अमरावती, नागपुरला घ्यावी लागते धाव

शहरापासून १० किलोमिटरवर असलेली चौसाळा टेकडी, आर्णी मार्गावर १२ किलोमिटरवर असलेले मनदेव येथील मंदीर, उद्यान याव्यतिरिक्त कुठलेही ठिकाण यवतमाळ शहरात किंवा शहरापासून अगदी जवळ उपलब्ध नाही. त्यामुळे शहरातील अनेक नागरिक सुटीच्या दिवशी विरंगुळ्यासाठी थेट अमरावती किंवा नागपूर येथे परिवारासह जातात.

उद्यानांव्यतिरिक्त इतर कुठेही नागरिकांना जाता यावे, दोन-चार तास परिवारासह घालवता यावे असे कुठलेही ठिकाण यवतमाळमध्ये नाही. त्यामुळे एखाद्याच्या घरी बाहेरगावावरुन पाहूणे आल्यास त्यांना शहरात फीरायला कुठे न्यावे हा प्रश्न शहरवासीयांसमोर उभा असतो. या सर्व बाबी लक्षात घेता यवतमाळ शहरात नागरिकांच्या विरंगुळ्यासाठी काही थीम उद्यान निर्मीती व्हावी अशी मागणी आहे. आझाद मैदान परिसरातील नेहरु उद्यान येथे तयार करण्यात आलेला ॲडव्हेन्चर पार्क काही वर्षांपूर्वी तयार करण्यात आला आहे. मात्र तयार झाल्यापासून हा पार्क सुरूच करण्यात आलेला नाही. त्याचप्रमाणे जांब मार्गावर वन विभागाच्या विश्राम गृहाच्या मागच्या बाजुला काही वर्षांपुर्वी उर्जा उद्यान तयार करण्यात आले आहे. मात्र वन विभागाच्या दुर्लक्षीपणामुळे अद्यापही ते उर्जा उद्यान तसेच बंद पडून आहे.

आणखी नव्या १० उद्यानांचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित यवतमाळ शहरात लहान मोठी अशी एकूण २७ उद्याने असल्याची नोंद पालिकेच्या दप्तरी आहे. यापैकी अनेक उद्याने त्या परिसरात असलेल्या खुल्या जागेवर तयार करण्यात आली आहेत. मोठी म्हणता येतील अशी केवळ दोन उद्याने आहेत. मात्र यापैकी कुठेही योग्य देखभाल दुरूस्ती नसल्याने परिसरातील नागरिकांशीवाय इतर नागरिक येतात असे उद्यान नाही. असे असताना आनखी नव्या १० ठिकाणी उद्याने तयार करण्यात यावी असा प्रस्ताव पालिकेकडे आला.

## क्रुझर आणि टाटा नेक्सन कारच्या धडकेत शेगावचे तीन पर्यटक जखमी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५चिखलदरा–**

चिखलदरा-मोथा मार्गावर धर्मशक्ती पॉईंटजवळ सोमवार, ४ ऑगस्टला एक अपघात घडला. या अपघातात शेगावचे तीन पर्यटक जखमी झाले. क्रुझर आणि टाटा नेक्सन कार यांच्यात समोरासमोर धडक झाल्याने हा अपघात झाला.अपघातात क्रुझर वाहनातील शेख

### चिखलदरा-मोथा मार्गावर अपघात:

मुस्तकीन (१०), अफरोज खान (२३) आणि अशीका जमील (२) हे शेगांव येथील पर्यटक जखमी झाले. त्यांना किरकोळ दुखापती झाल्याने स्थानिक ग्रामीण रुग्णालयात उपचार करण्यात आले.



क्रुझर क्रमांक एमएच २८ व्ही ७०८६ आणि टाटा नेक्सन कार क्रमांक एमएच २७ डीयु ६८३७ या दोन वाहनांमध्ये ही धडक झाली. अपघातामुळे या मार्गावरील वाहतूक काही काळासाठी विस्कळीत झाली होती.

चिखलदरा पर्यटनस्थळी येणाऱ्या पर्यटकांच्या वाहनांची गर्दी आता नेहमीची बाब झाली आहे. घाट वळणाच्या या रस्त्यावर वाहन सावधगिरीने चालविणे आवश्यक असते. तरीही काही पर्यटक भरधाव वाहने चालवून अपघातास कारणीभूत ठरतात.

अपघाताची माहिती मिळताच चिखलदरा पोलिस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी तातडीने जखमींना रुग्णालयात दाखल करण्याची व्यवस्था केली.

# चांदुरात महावितरणने कागदावरच बसवले मीटर

## प्रत्यक्षात ग्राहकाच्या घरी अद्याप पोहोचलेच नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५चांदुरबाजार–** चांदुर बाजार येथील एका विचित्र प्रकरणात महावितरणने एका ग्राहकाचे मीटर प्रत्यक्षात बसवण्याआधीच संगणकावर त्याची नोंद घेतली आहे. स्थानिक रहिवासी सूरज देवहाते यांनी महावितरणच्या संकेतस्थळावर नवीन मीटरसाठी ऑनलाईन अर्ज केला होता. त्यानुसार महावितरणने त्यांना शुल्काची मागणी केली आणि देवहाते यांनी ते भरलेही. महावितरणने १४ जुलैला मीटर इंस्टॉल केल्याचा संदेश देवहाते यांच्या मोबाईलवर पाठवला. परंतु प्रत्यक्षात त्यांच्या घरी मीटर पोहोचलेच




नव्हते.संगणकावर मीटर इंस्टॉल झाल्याची नोंद केल्यानंतर तीन दिवसांनी (१७ जुलैला) वायरमनने देवहाते यांना फोन करून मीटर लावण्याबाबत विचारले. देवहाते यांनी त्यांना दुपारी ४ वाजता किंवा दुसऱ्या दिवशी येण्यास सांगितले.वायरमनने त्यांना त्याच दिवशी मीटर लावणे आवश्यक असल्याचे सांगितले. अन्यथा तो सुटीवर जात असल्याने ४ दिवसांनंतरच मीटर लावले जाईल असे सांगितले. २१ जुलैला देवहाते कुटुंब ८ दिवसांसाठी बाहेरगावी गेले.

परत आल्यानंतरही त्यांच्या घरी मीटर बसवलेले नव्हते. अखेर त्यांनी उप कार्यकारी अभियंत्यांकडे तक्रार दाखल केली आहे. त्यांनी दोषी अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी केली आहे.सध्या देवहाते यांच्या घरी प्रत्यक्षात मीटर बसवलेले नसतानाही महावितरणच्या नोंदीत मात्र मीटर इंस्टॉल झाल्याचे दाखवले आहे. आता संबंधित अधिकारी या प्रकरणावर काय निर्णय घेतात याची देवहाते यांना प्रतीक्षा आहे.

# अंजनगाव तालुक्यात नवीन लावलेल्या 'स्मार्ट मीटर'ची गती अधिक




## वीज ग्राहकांना मोजावी लागते ६० ते ७० टक्के अधिक रक्कम?

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अंजनगाव सुर्जी –** महावितरण कंपनीने अंजनगाव सुर्जी तालुक्यातील ग्राहकांकडील विजेचे चालू मीटर काढून 'स्मार्ट मीटर' लावणे सुरू केले आहे. ग्रामीण भागातील ग्राहकांनी या स्मार्ट मीटरला विरोध करायला सुरुवात केली असली, तरी कंपनीचे कर्मचारी चोरून-लपून किंवा चुकीची माहिती देऊन हे मीटर लावत आहेत असा आरोप आहे. ग्राहकांचा विरोध आणि महावितरण कंपनीचा आग्रह या दोन महत्त्वाच्या बाबींकडे सध्या कुणीही गांभीर्याने बघत नाही. वास्तवात या स्मार्ट मीटरची गती ही साध्या मीटरच्या तुलनेत ६० टक्क्यांपेक्षा अधिक असल्याचे भडांरज येथिल राहुल गजानन हरबळे या ग्राहकाच्या आलेल्या बिलावरून सिद्ध होत आहे. त्यामुळे ग्राहकांना सध्याच्या वीजबिलापेक्षा किमान ६० ते ७० टक्के अधिक रक्कम मोजावी लागेल अशी शक्यता वर्तविली जात आहे.जानेवारी २०२५ पासून 'प्री-पेड मीटर'ला पर्याय म्हणून 'स्मार्ट मीटर'ची चर्चा सुरू झाली. अलीकडच्या काळात महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी ग्राहकांच्या विरोधाकडे दुर्लक्ष करीत स्मार्ट मीटर लावायला सुरुवात केली. मात्र आता अव्वाच्या सव्वा वीज ग्राहकांना बिल येत असल्याने तालुक्यातील सामाजिक संघटनां रस्त्यावर उतरून महावितरण कंपनी विरोधात आंदोलनाच्या माध्यमातून विरोध दर्शवित आहे

**१२ हजार किमतीचे मीटर असल्याची अफवा महावितरण–** अंजनगाव सुर्जी महावितरण कंपनी उपविभागीय कार्यालय अंतर्गत ३६ हजार च्या जवळपास वीज ग्राहक असून, ते सर्व महावितरण कंपनीला जोडले आहेत.

या स्मार्ट मीटरची किंमत १२ हजार रुपये असल्याची चर्चा असून महावितरण कंपनी हे १२ हजार रुपये ग्राहकांकडूनच वीज बिलात अतिरिक्त रक्कम जोडून टप्प्याटप्प्याने वसूल करणार असल्याची चर्चा होत होती. महावितरण कंपनीचे कार्यकारी अभियंता अचलपूर प्रदीप अंधारे यांच्याशी चर्चा केली असता ग्राहकांमध्ये १२ हजार किमतीचे मीटर असल्याचा गैरसमज आहे वीज बिलात अशी कोणतीही रक्कम वसूल होणार नसल्याचे त्यांनी सांगितले तर स्मार्ट मीटर हे भारत सरकारच्या विद्युत मंत्रालयाच्या राजपत्रा नुसार सर्व राज्यांत मीटर बसविण्यात येत आहे . स्मार्ट मीटर ऊर्जेचा वापराचे अचूक मोजमाप देऊन स्मार्ट मीटर हे सुनिश्चित करून प्रत्यक्षात वापरत असलेल्या वीजेचे बिल देते.त्यामुळे ग्राहकांची कोणतीही दिशाभूल व फसवणूक होत नाही असे प्रदिप अंधारे कार्यकारी अभियंता यांनी प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.-

# भातकुली, चिखलदरा बाजार समितीसाठी हालचाली गतिमान,जागेबाबत प्रस्ताव पाठवा

## जिल्हा उपनिबंधकांचे संबंधित 'एआर' यांना पत्र

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती–**

चिखलदरा येथे नव्याने व अमरावती बाजार समितीच्या विभाजनातून भातकुली येथे कृषी उत्पन्न बाजार समितीची निर्मिती होत आहे. या अनुषंगाने जागेची स्थळपाहणी प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करण्याचे आदेश पणन संचालकांनी दिले आहे. या पार्श्वभूमीवर नव्याने बाजार समिती स्थापनेसाठी सहकार विभागात हालचाली गतिमान झाल्या आहेत.

### ■अमरावती बाजार समितीवर गंडांतर

अमरावती बाजार समितीच्या विभाजनातून भातकुली बाजार समितीचा कारभार स्वतंत्र होणार आहे. त्यामुळे कार्यक्षेत्र, मनुष्यबळ, उपबाजार, बँकेतील ठेवी जागा याच्या विभागणी होणार असल्याने बाजार समिती लवकरच बरखास्त होण्याची शक्यता आहे. या बाजार समितीच्या पदाधिकाऱ्यांना यापूर्वीच जिल्हा उपनिबंधकांनी नोटीस बजावली आहे. या नोटीसला उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे.

मुख्यमंत्री बाजार समिती योजनेंतर्गत राज्यात ज्या तालुक्यात बाजार समिती नाही तेथे नव्याने बाजार समिती तयार करण्यात येणार आहे. या तालुक्यात १७ एप्रिल २०२५च्या आदेशाने नव्याने बाजार समिती अस्तित्वात येणार आहे.जिल्ह्यात तिवसा, धामणगाव रेल्वे, चांदूर रेल्वे, नांदगाव दर्यापूर, चांदूरबाजार, अचलपूर, मोर्शी, वरुड व धारणी, अंजनगाव, तालुक्यात बाजार समित्या अस्तित्वात आहेत.

याशिवाय अमरावती व भातकुलीची एकत्रित बाजार समिती आहे व चिखलदरा येथे बाज़ार समिती अस्तित्वात नाही. त्यामुळे भातकुली व चिखलदरा येथे नव्याने बाजार समिती गठित करण्यात येत आहे.

■ भातकुली बाजार समितीसाठी उपबाजाराची जागा उपलब्ध आहे, चिखलदराकरिता जागेचा शोध सुरू आहे. संबंधित सहायक निबंधक यांना त्या अनुषंगाने पत्र दिले आहे. जागेची पाहणी करुन तालुक्यातून प्रस्ताव मागितले आहे.

**शंकर कुंभार, जिल्हा उपनिबंधक (सहकारी संस्था)**

### भातकुलीत जागा उपलब्ध चिखलदऱ्यात शोध सुरु

भातकुली येथे अमरावती बाजार समितीचा उपबाजार असल्याने पुरेशी व सोयीची जागा उपलब्ध आहे. मात्र चिखलदरा येथे जागेची समस्या आहे. त्यामुळे अचलपूरचे सहायक निबंधक हे चिखलदरा तहसीलदार यांच्या सहकार्याने आवश्यक जागेचा शोध घेत आहे. यासाठी १० एकरापेक्षा अधिक जागा आवश्यक आहे. त्यानंतर संबंधित जागेचा प्रस्ताव येणार आहे.

# तयारी उत्सवाची: रक्षाबंधनसाठी आता डोरेमोन, मल्टी कलर, मिकी माऊस राख्या बाजारात; मागणी वाढली

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५दर्यापूर–** बहीण-भावातील अतूट नात्याला बळकटी देणारा रक्षाबंधन हा सण काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. या पारंपरिक सणाला आता काही प्रमाणात आधुनिकतेचा साज चढला आहे. त्यानिमित्ताने विविध राख्यांचा ट्रेण्ड बाजारात रूढ झाला आहे. आकर्षक राख्यांनी बाजारपेठ सजली आहे. रविवार सुटीचा दिवस असल्याने राखी खरेदीसाठी दर्यापूर बाजारात बहिणींची गर्दी वाढल्याचे चित्र पाहायला मिळाले.काळानुरूप राख्यांसाठी आता पाच-दहा रुपये खर्च करण्याची मानसीकता बदलून डिझायनर राख्यांसाठी शंभर रुपयांपासून पुढे राख्या मिळत आहे. दुसरीकडे खर्च करायला



महिला ग्राहक तयार आहेत. पारंपरिक राख्यांसोबतच सध्या मल्टि कलर लेसेस, डोरेमोनसह विविध कार्टून्स, डायमंड वर्क, फॅन्सी, मोती, स्टोन, गोंड्याच्या राख्या, अशा १० रुपयापासून एक हजार रुपयांपर्यंत विविध प्रकारच्या राख्या बाजारात विक्रीसाठी उपलब्ध आहे. सहा दिवसावर रक्षाबंधन हा सण आला असून दर्यापूर शहरात बसस्थानक चौक, गांधी चौक, जयस्तंभ चौक, बाभळी, मरिमाता मंदीर चौक आदी ठिकठिकाणी राखी विक्रेत्यांनी दुकाने थाटलेली आहेत. भावासाठी घरगुती हँडमेड राखी अधिक लक्षवेधी धावपळीच्या युगात प्रत्येक वस्तू रेडिमेड स्वरुपात उपलब्ध आहे. परंतु, आपल्या लाडक्या भावासाठी वेळात वेळ काढून स्वतःच्या हाताने राखी तयार करण्याचे समाधान वेगळेच असते. त्यामुळे भावाच्या मनगटावर राखी बांधण्यासाठी काही बहिणी स्वतः आपल्या हाताने राखी तयार करण्याला पसंती देत आहेत. घरी उपलब्ध असलेल्या साधनांमधूनच आकर्षक व पर्यावरणपूरक राख्या तयार करण्यासाठी त्या प्राधान्य देत आहेत.

# खरीप ९८ टक्क्यांवर स्थिरावला

## ६.६८ लाख हेक्टर पेरणी क्षेत्र रिमझिम पावसाने दिलासा

### सर्वाधिक २.४५ लाख हेक्टरमध्ये सोयाबीन

**विदर्भ प्रजासत्ताकदि.५अमरावती** पेरणीसाठी पोषक पावसानेसद्य:स्थितीत खरीप हंगामाच्या पेरणी अंतिम झाल्या आहेत. जिल्ह्यात आतापर्यंत ६.६८ लाख हेक्टरवर पेरणी आटोपली. ही ९८ टक्केवारी आहे. यामध्ये सर्वाधिक २.४५ लाख हेक्टर सोयाबीन, तर २.४० लाख हेक्टरमध्ये कपाशीचे क्षेत्र आहे.यावर्षी जूनमध्ये उशिरा पाऊस व जुलैमध्ये १२ दिवसांची उसंत यामुळे खरिपाच्या पेरण्या काही भागांत खोळंबल्या होत्या. आता चारदिवसांपासून हलका पाऊस होत असल्याने राहिलेल्या पेरण्या पूर्णत्वाला गेल्या आहेत. यंदाच्या खरिपासाठी ६.८३



लाख हेक्टर सरासरी क्षेत्र होते. त्या तुलनेत ६,६७,५५२ हेक्टरमध्ये खरिपाची पेरणी आटोपली आहे.यामध्ये धारणी तालुक्यात४९,७९४ हेक्टर, चिखलदरा २३,७६६, अमरावती ५१,२३१, भातकुली ४८६३०, नांदगाव खंडेश्वर ६५,२०६, चांदूर रेल्वे ३९९७६, तिवसा ३८,२७१, मोर्शी ५७,५९३, धेरूड ४३,४०९, दर्यापूर ७२,०७४, अंजनगाव सुर्जी ४१,५२५, अचलपूर ३८,६२५, चांदूर बाजार ४१,४२५ व धामणगाव तालुक्यांत ५६,०४० हेक्टरमध्ये खरिपाची पेरणी आटोपली आहे. आता पिके वाढीच्या अवस्थेत आहेत. त्यामुळे शिवारात शेतीकामांची लगबग सुरु आहे.

**पीकनिहाय क्षेत्र (हेक्टर)**

यावर्षी धान पिकाची ६६३१ हेक्टरमध्ये, ज्वारी ४०५६, मका ४३१०९, बाजरी २५८, तूर ११७१८६, मूग ७६३, उडीद ५५९, सोयाबीन २,४५,०९३, भुईमूग ३४९, तीळ ५.८०, कपाशी २,४०,२६० हेक्टर क्षेत्रात पेरणी झालेली आहे. यामध्ये कपाशी व सोयाबीनचे प्रस्तावित क्षेत्राचे तुलनेत कमी पेरणी क्षेत्र आहे, तर मक्याचे क्षेत्र अनपेक्षितपणे वाढल्याचे दिसून येते.

# आठ ऑगस्ट रोजी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचा भव्य रोजगार मेळावा

## नामांकित कंपन्यात ऑन द स्पॉट मिळणार रोजगार; दिग्गज नेत्यांची राहणार उपस्थिती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५ अमरावती**






बेरोजगारांना चांगल्या कंपन्यांमध्ये रोजगार मिळावा यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पक्षाच्या वतीने भव्य रोजगार मिळायचे आयोजन करण्यात आले असून पहिल्यांदाच नामांकित कंपन्या अमरावतीत येणार आहे. या माध्यमातून ऑन द स्पॉट बेरोजगारांना रोजगार मिळणार असल्याची माहिती रोजगार मेळाव्याचे मुख्य संयोजक व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहर जिल्हाध्यक्षप्रा.डॉ.हेमंत देशमुख यांनी पत्रकार परिषदेत दिली.

महाविद्यालयीन विद्यार्थी,मुले व मुली तसेच ज्यांच्याकडे विविध प्रकारचे कौशल्य आहे अशा १८ वर्षावरील बेरोजगारांना विविध कंपन्यांमध्ये थेट मुलाखती द्वारे रोजगार देण्याची संधी अमरावतीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाच्या वतीने पहिल्यांदाच उपलब्ध करून देण्यात आली आहे. पाचवी ते पदवीधर शैक्षणिक पात्रता असलेल्या बेरोजगारांना त्यांच्या गरजेनुसार विविध कंपन्यांमध्ये रोजगार उपलब्ध करून देण्यात येणार आहेजवळपास २००० हजार बेरोजगारांना ऑन द स्पॉट रोजगार देण्यासाठी नामांकित कंपन्यांसोबत संपर्क साधण्यात आला आहे. कोणत्याही प्रकारचे शुल्क न घेता बेरोजगारांना ही संधी उपलब्ध करून देण्यात आल्यामुळे या संधीचा मोठ्या प्रमाणात लाभ घेण्याचे आवाहन प्रा.डॉ.हेमंत देशमुख यांनी पत्रकार परिषदेतून केले.अमरावती शहर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने शुक्रवार आठ ऑगस्ट रोजी सकाळी नऊ ते तीन या दरम्यान संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन अमरावती येथे हा भव्य रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. यामध्ये स्थानिक व अमरावती विभागातील बेरोजगारांना एक चांगली संधी रोजगाराच्या माध्यमातून उपलब्ध होणार आहे. जवळपास ३० नामांकित कंपन्यासह इतरही काही कंपन्यांनी रोजगार देण्याची तयारी दाखवली आहे. याकरिता या अमरावती शहर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने मोठ्या प्रमाणात तयारी केलेली आहे. बेरोजगारांना ऑनलाइन व ऑफलाइन नोंदणीसाठी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. मुलाखतीला येणार्यांसाठी संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन सांस्कृतिक येथे विशेष व्यवस्था करण्यात आली असून त्याच दिवशी नोकरीचे लेटर निवड होणार्यांना दिली जातील.आतापर्यंत २००० बेरोजगारांनी नोंदणी केली असून आठ तारखेपर्यंत पाच हजार नोंदणी होईल अशी आशा व्यक्त करून हेमंत देशमुख यांनी युवकांनी या संधीचा अधिक लाभ घ्यावा असे आवाहन केले.

**दिग्गज नेत्यांची उपस्थिती**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पार्टीच्या वतीने आयोजित या मेळाव्याला पक्षाचे दिग्गज नेते उपस्थित राहणार आहे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, युवा नेते रोहित पवार, माजी गृहमंत्री अनिल देशमुख,श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, खा.अमर काळे, रमेशजी बंग यांची या मेळाव्याला प्रमुख उपस्थिती राहणार आहे.प्रदेशाध्यक्षपद स्वीकारल्या नंतर प्रथमच अमरावती येथे येत असल्याने शशिकांत शिंदे यांच्या सत्काराचे आयोजन करण्यात आले आहे.पत्रकार परिषदेला गणेश रॉय, सय्यद मन्सूर,अविनाश ठाकरे, निखिल देशमुख, मंगेश भटकर, रोशन कडू, तेजस्वी वर्षाताई भटकर, वर्षाताई गतफणे, विजयराव हावरे, मोबीन माजीद,रावसाहेब वाटणे, विशाल बोरखडे, सतीश चरपे, ड .धनंजय तोटे, अमित गावंडे, वहिद खान यांची उपस्थिती होती.

# श्रीक्षेत्र नागरवाडी येथे मुलींच्या सुसज्ज निवास हॉलचा उद्घाटन सोहळा उत्साहात संपन्न

## आदिवासी मुला-मुलींना वाटले विविध प्रकारचे साहित्य



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५चांदूरबाजार**

कर्मयोगी संत गाडगेबाबांचे अंतिम श्रध्दास्थान असलेल्या,श्री गाडगे महाराज संस्था श्रीक्षेत्र नागरवाडी येथे मुंबई येथिल उदार दयाळु सितादेवी संतोषकुमारजी झुनझुनवाला यांच्या विशेष पुढाकारातून आश्रमशाळेतील मुलींच्या निवासाकरीता २० लक्ष रुपये खर्चातून सोयीसुविधायुक्त नव्याने उभारण्यात आलेल्या निवास हॉलचा उद्घाटन सोहळा मोठ्या उत्साहात या ठिकाणी पार पडला.

याप्रसंगी नागरवाडी इंद्रभुवानाचे शिल्पकार तथा संस्थेचे सर्वेसर्वा बापूसाहेब देशमुख यांच्या समवेत आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांनी दानशुर सितादेवी संतोषकुमारजी झुनझुनवाला व परीवार तसेच सोहळयाला विशेष उपस्थित मान्यवरांचे शाल,श्रीफळ,पुष्पहार देवुन हृदयस्पर्शी असे स्वागत केले.दरम्यान सितादेवी संतोषकुमारजी झुनझुनवाला यांनी कर्मयोगी संत गाडगेबाबांच्या मुर्तीचे पुजन व माल्यार्पण करत त्यांना अभिवादन केले. यानंतर प्रामुख्याने उदार दयाळु स्व.संतोषकुमारजी झुनझुनवाला यांच्या स्मरणार्थश्रीमती.सितादेवी संतोषकुमारजी झुनझुनवाला यांनी मेळघाटक्षेत्रातील शिक्षण घेत असलेल्या, गोरगरीब आदिवासी मुलींच्या निवासाकरीता सर्व सोयीसुविधा युक्त नव्याने उभारण्यात आलेल्या सुंदर अशा प्रशस्त निवास हॉलचे उद्घाटन दानशुर सितादेवी संतोषकुमारजी झुनझुनवाला यांच्या हस्ते यावेळी करण्यात आले.या उद्घाटन प्रसंगी बोलताना श्री.बापूसाहेब देशमुख म्हणाले आदिवासी विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेसह शिक्षणाच्या संधी वाढवण्याच्या दृष्टीने संस्थेचे कार्य अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. शिक्षणाच्या माध्यमातून समाजाची उन्नती शक्य आहे आणि यासाठी संस्था सातत्याने प्रयत्नशील आहेत. नवीन निवास हॉलमध्ये एकूण ४० मुली राहण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. हॉलमध्ये सुसज्ज वसतिगृह, पिण्याच्या पाण्याची सोय, स्वच्छतागृह, वाचन व्यवस्था आणि सुरक्षिततेची पुरेशी काळजी घेण्यात आली असल्याचे ते बोलत होते.प्रामुख्याने सेवाव्रती बापूसाहेब देशमुख यांच्या प्रमुख मार्गदर्शनात नागरवाडी इंद्रभुवन नगरीतून संत गाडगेबाबांचे विचार व गरजूंच्या सेवेचे प्रमुख केंद्र निर्माण होत असल्याचे प्रा.डॉ.अरविंद देशमुख व्यासपिठावरुन यावेळी बोलत होते.या श्रृंखलेत मुंबई येथिल दानशुर झुनझुनवाला परिवार यांनी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना सुंदर खेळ साहित्य व मुलींना सौंदर्य प्रसादनाचे वितरण यावेळी केले.सरतेशेवटी सर्वांनी स्नेहभोजनासह आईसक्रीम व पाणीपुरीचा आस्वाद घेत या कार्यक्रमाची यशस्वी सांगता करण्यात आली.या कार्यक्रमाला मुंबई येथिल संदिपभैय्याझुनझुनवाला,संजयभैय्या झुनझुनवाला, सारिकाबेन झुनझुनवाला,प्रियाबेन झुनझुनवाला, बबिताबेन झुनझुनवाला, प्रा.डॉ.अरविंदजी देशमुख, श्री.दिपकदादा देशमुख, श्री.किशोरसिंहजी गहलोत, सरपंच मॅडम सौ.मनिषाताई इंगळे, श्री.नामदेवराव दरवाई, श्री.केशवराव गावंडे, व्यवस्थापक श्री.गजानन देशमुख,व्यवस्थापक श्री.प्रशांतभाऊ देशमुख, दादरसंचालक श्री.सागरभाऊ देशमुख, श्री.कुणालभाऊ देशमुख नाशिक, श्री.प्रकाशभाऊ महात्मे, श्री.गजाननभाऊ जवंजाळ,माजी मुख्याध्यापक श्री.किशोर चौधरी, पत्रकार धनंजय धांडे, श्री.अमोळ कंटाळे, श्री.संतोष मिसाळ, श्री.रमेश तोटे, श्री.सुखदेवराव नवघरे, श्री.सुनिल मोहोड, श्री.अमोल शेळके, श्री.शुभम कठाळे महाराज,तसेच परिसारीतील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.विशेषत: या कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता शाळेचे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# शेतातील जुगारावर धाड; १५ जुगारी अटक

## ३ लाख ३१ हजारांच्या साहित्यासह आरोपींना अटक



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अंजनगावसुर्जी**

शेतात सुरूअसलेल्या जुगारावर पोलिसांनी अचानक धाड टाकली. या धाडीत १५ जुगाऱ्यांना पोलिसांनी अटक केली असून, त्यांच्याजवळून अंदाजे २ लाख ३१ हजार २०० रुपयांचे साहित्य जप्त करण्यात आले आहे. ही कारवाई शिरजगाव रस्त्यावरील प्रेम रॉय शेतात ३ ऑगस्टरोजी घडली.

सुर्जी अंजनगाव येथील शिरजगाव रस्त्यावर असलेल्या प्रेम रॉय यांच्या शेतात जुगारभरविल्याचे मिळालेल्या खात्रीलायक माहिती पोलिसांना मिळाली असता पोलिसांनी धाड टाकून जुगार खेळणाऱ्या १५ जणांना अटक केली. त्यामध्ये प्रवीण तायडे, (४३) रा. हंतोडा, संतोष इंगळे (४२) रा. भिमनगर सुर्जी शिवा ऊर्फ आकाश राउत, (२३) रा. मातंगपुरा, रवींद्र इंगळे (३५) रा. तहसील रोड सुर्जी, रोहित अनिलसपकाळ (२१) सलीमनगर सुर्जी, प्रमोद से. इंगळे (३२) ऋषिकेश नांदुरकर, (२४), प्रदीप विजयकर (२४) चौघेही रा. शहापुरा सुर्जी, राजू प्र. कोठेकर, (३०) रा. बेरपुरा सुर्जी, मनोज अ. गौर, (२७) विवेक ऊर्फ विक्की मोरे (२४) रा. भोईपुरा सुर्जी, शे. जाकीर शे. इब्राहीम. (३८) दीपक ज. कनोजिया (३०) दोघेही रा. संगई शाळेजवळ, शरिफ खॉ शफी खॉ (४७) रा.भालदारपुरा, राहुल प्र. इंगळे (२६) रा. पानअटाई अंजनगाव सुर्जी यांना जुगार खेळताना अटक करण्यात आली आरोपींकडून रोख, मोबाईल, पाच दुचाकी असा ३ लाख ३१ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई ठाणेदार सूरज तेलगोटे, पो. कॉ. रवी राठोड, आकाश रंगारी, अमित घाटे, शुभाम मारकंड, प्रमोद चव्हाण, युवराज सोळंके, मोहसिन पठाण, चालक पो. कॉ. अक्षय शेळके, विलास रामते यांनी केली आहे.

# ३१७ ग्रामपंचायतींना १५ वित्त आयोगाचा निधी मिळाला नाहीच; ग्रामविकास थांबला; गावकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

'गावाचा विकास हाच देशाचा विकास' हे ब्रीदवाक्य असतानाही अमरावती जिल्ह्यातील तब्बल ३१७ ग्रामपंचायतींना २०२४-२५ सालचा १५ वित्त आयोगाचा निधीच प्राप्त झालेला नाही, ही धक्कादायक बाब समोर आली आहे. यामुळे स्थानिक पातळीवरील विकासकामे ठप्प झाली असून, ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. जिल्ह्यातील एकूण ८४१ ग्रामपंचायतींपैकी ३१७ ग्रामपंचायतींना केवळ दोनच टप्प्यांतील निधी मिळाला असून उर्वरित दोन टप्प्यांचा निधी अद्यापही प्राप्त झालेला नाही. परिणामी, पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते, नाल्या, समाजमंदिरे यांसारखी मुलभूत कामे खोळंबली आहेत. काय आहे १५ वित्त आयोगाचा निधी केंद्र सरकारकडून जिल्हा परिषदेमार्फत ग्रामपंचायतींना दरवर्षी १५ वित्त(४०%) आयोगांतर्गत निधी वितरित केला जातो. बंधित (६०%) आणि अबंधित ३०% राहिल्या बंधित निधी पाणीपुरवठा, ३०% बंधित निधी स्वच्छता, ४०% अबंधित निधी -रस्ते, नाल्या, विकासकामे अशा स्वरूपात या निधी मिळतात. २०२३ पर्यंत हा निधी नियमितपणे मिळत होता. मात्र २०२४-२५ मध्ये मोठ्या संख्येने ग्रामपंचायती निधीपासून आहेत. प्रशासनाकडून स्पष्टता अपेक्षित ग्रामपंचायतींच्या विकासाच्या दृष्टीने वित्त आयोगाचा निधी अत्यंत महत्त्वाचा असतो. निधी वितरणातले अडथळे त्वरित दूर करून, शिल्लक टप्प्यांचा निधी लवकरात वंचित लवकर वितरित करावा, अशी ग्रामस्थांची आणि लोकप्रतिनिधींची मागणी आहे.

# १४१ वीजचोरांना महावितरणकडून ३५ लाखांचा दंड; दंड न भरल्यास फौजदारी कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अचलपूर**




महावितरण विभागाने जुलै महिन्यात वीज चोरीविरोधात राबवलेल्या विशेष मोहिमेमध्ये तब्बल १४१ वीजचोरांवर कारवाई करत ३५ लाख १५ हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे. वीजचोरी करणाऱ्यांवर वीज कायदा २००३ च्या कलम १३५ अंतर्गत फौजदारी गुन्हे दाखल करण्याची तयारीही करण्यात आली आहे. कार्यकारी अभियंता प्रदीप अंधारे यांनी दिलेल्या माहितीनुसार, अधीक्षक अभियंता दीपक देवहाते यांच्या मार्गदर्शनाखाली १ जुलै ते ३१ जुलैदरम्यान धडक तपास मोहीम राबवण्यात आली यामध्ये १ लाख ५२ हजार युनिट्सची वीजचोरी झाल्याचे आढळून आले. ज्यामुळे महावितरणला ३५ लाखांहून अधिक आर्थिक नुकसान सहन करावे लागले. दंडात्मक कारवाईत आतापर्यंत ७५ प्रकरणांमध्ये १९ लाख ३० हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला असून ५० प्रकरणांमध्ये १ लाख ३८ हजार रुपयांची तडजोड शुल्क म्हणून भरपाई घेण्यात आली आहे.

वीज चोरीमुळे रोहित्रांचे ओझे वाढते, वारंवार शॉर्टसर्किट, आगीच्या घटना, वीजपुरवठ्यात अडथळा अशा समस्या निर्माण होतात. त्यासोबतच महावितरणच्या आर्थिक नुकसानीतही लक्षणीय वाढ होते. त्यामुळे वीजचोरी करणाऱ्याऱ्यांवर आकस्मिक आणि तीव्र कारवाई करण्यात येणार आहे. प्रत्येक शाखा अभियंत्याला ठराविक उद्दिष्ट दिले असून, या मोहिमेत कोणताही अडथळा सहन केला जाणार नाही. वीज ग्राहकांनी सहकार्य करावे, असे आवाहन प्रदीप अंधारे यांनी केले.

# दत्त मंदिर संस्थानच्या जमिनींवरील बेकायदेशीर आदेश रद्द करा

## महाराष्ट्र मंदिर महासंघाचे एस.डी.ओ. अचलपूर यांना निवेदन; तहसीलदारांनी मयत विश्वस्ताविरुद्ध पारित केला होता आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अचलपूर**



अचलपूर तहसीलदार अचलपूर यांनी दत्तमंदिर संस्थानच्या मालकीची मौजा नायगाव येथील सर्वे नं. ६६/४ ही शेतजमीन कब्जेदाराच्या नावे खरेदी करून देण्याचा जो आदेश १३ एप्रिल २०२३ रोजी पारित केला, तो बेकायदेशीर आहे व त्वरित रद्द करण्यात यावा, अशी प्रमुख मागणी महाराष्ट्र मंदिर महासंघाने केली आहे. या मागणीसाठी महासंघाच्यावतीने उपविभागीय अधिकारी, अचलपूर यांच्याकडे औपचारिक निवेदन सादर करण्यात आले.

उल्लेखनीय आहे की, सदर शेतजमिनीचा खरेदीचा दावा यापूर्वीच ८ सप्टेंबर १९६५ रोजी तत्कालीन तहसीलदारांनी रद्द केला होता. त्यामुळे कब्जेदाराच्या वारसांना पुन्हा खरेदीचा अधिकार नाही. विशेष बाब म्हणजे विद्यमान विश्वस्तांना प्रकरणात पक्षकार न करता तहसीलदार यानी मयत विश्वस्ताविरुद्ध निर्णय दिलेला होता, जो कायद्याच्या व नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांना धरून नाही. दत्तमंदिर संस्थानच्या विश्वस्तांना भुजवाडा दर्यापूर येथील काळेश्वर महादेव संस्थानच्या खरेदी आदेशाच्या रद्द करणाबाबत वृत्तपत्रांतून माहिती मिळाल्यानंतर त्यांनी महाराष्ट्र मंदिर महासंघाशी संपर्क साधला. त्यानंतर महासंघाने तातडीने सदर प्रकरणाचा पाठपुरावा करत अचलपूर येथील एस. डी. ओ. यांच्याकडे ही तकार सादर केली.सर्वोच्च न्यायालय व उच्त न्यायालयांनी मालमत्तांबाबत देवस्थान वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार मंदिर संस्थांची संपत्ती ही विशिष्ट हेतूसाठी असून ती खाजगी व्यक्तीच्या नावे वर्ग करता येत नाही. त्यामुळेच तहसीलदार अचलपूर यांनी दिलेला आदेश हा स्पष्टपणे चुकीचा आणि देवस्थान मालमत्तांवर आक्रमण करणारी कारवाई आहे, असे महासंघाने निवेदनात नमूद केले आहे.निवेदन देताना महाराष्ट्र मंदिर महासंघाचे राज्य कोअर कमिटी पदाधिकारी अनुप जयस्वाल, सदस्य विनीत पाखोडे, दत्तमंदिर संस्थानचे विश्वस्त अविनाश जुनघरे, श्रीकृष्ण सावरकर, दीपक जावरकर, सुरेश पवार तसेच अचलपूर येथील मंदिर सेवक मयूर दीक्षित आणि अजय तिवारी उपस्थित होते.

# स्वातंत्र्यदिनानिमित्त मेळघाट हाट येथे खादी महोत्सव

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५अमरावती**

खादी व ग्रामोद्योग मंडळ आणि महिला आर्थिक विकास महामंडळाच्या वतीने स्वातंत्र्यदिनानिमित्त बसस्थानकासमोरील मेळघाट हाट येथे खादी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हा महोत्सव ६ ते १५ ऑगस्ट या कालावधीत होईल. या महोत्सवाचे उद्घाटन ६ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र उपस्थित राहतील. या महोत्सवात, विकेंद्रित सोलर चरखा समूहाच्या कार्यक्रमांतर्गत लाभार्थी महिलांनी तयार केलेली दर्जेदार खादी आणि सौर खादी उत्पादने उपलब्ध असतील. तसेच, महिला आर्थिक विकास महामंडळाच्या बचतगटांनी तयार केलेली विविध उत्पादने सवलतीच्या दरात नागरिकांना मिळणार आहेत. खादी महोत्सव दररोज सकाळी १० ते रात्री ९ वाजेपर्यंत सुरू राहील. या महोत्सवाला नागरिकांनी भेट द्यावी, असे आवाहन खादी व ग्रामोद्योग मंडळ आणि महिला आर्थिक विकास महामंडळाने केले आहे.

# तपोवनातील लाभार्थ्यांचे फेसपद्धारे आधार सिडींग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**




तपोवनात राहणाऱ्या कुष्ठरोगी लाभार्थ्यांसाठी जिल्हा प्रशासनातर्फे फेसपद्धारे आधार सिडींग करण्यात आले. तसेच इंडियन पोस्ट पेमेंट बँकेच्या सहायाने खाते उघडण्यात आले.

जिल्हाधिकारी आशिष येरेकर आणि निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर यांच्या मार्गदर्शनाखाली तपोवन येथील लाभार्थ्यांचे आधार बँक सिडींग करण्यासाठी समस्या निर्माण झाली. यातील कुष्ठरोगी लाभार्थ्यांसाठी इंडियन पोस्ट पेमेंट बँकेतर्फे फेसपद्धारे झिरो बॅलन्स आधार सिडींग खाते उघडण्यासाठी शिबिर पार पडले. शिबिरामध्ये ६० लाभार्थ्यांचे फेसपद्धारे झिरो बॅलन्स आधार सिडिंग करण्यात आले.

शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळण्यासाठी आधार क्रमांकाची जोडणी असलेले बँक खाते असणे आवश्यक आहे. मात्र कुष्ठरोगी लाभार्थ्यांच्या आधार प्रमाणीकरणाचा प्रश्न निर्माण झाला. याबाबत इंडियन पोस्ट पेमेंट बँकेने पुढाकार घेऊन जिल्हा प्रशासनाच्या वतीने कुष्ठरोगी लाभार्थ्यांच्या डोळ्यातील बुबुळाचा फोटो घेऊन बँक खाते उघडण्यात आले. तसेच आधार सिडींग करण्यात आले.तसेच वयोमानाने लाभार्थ्यांच्या बोटाचे ठसे घेण्यात अडचणी येत असल्यास फेसपद्धारे त्यांचे आधार प्रमाणीकरण करण्यात येणार आहे. जिल्हा प्रशासनाच्या पुढाकाराने या लाभार्थ्यांना विविध योजनांचा लाभ मिळण्यास मदत होणार आहे.

# बाप्पांवर महागाईचे विघ्न; पीओपी मूर्ती ५० टक्के घटणार, किमती मात्र वाढणार

## कच्च्या मालाच्या किमती वाढल्याने दरात वाढ

विदर्भ प्रजासत्ताक
दि.५अमरावती

गणेशोत्सव अवघ्या तीन आठवड्यांवर येऊन ठेपलेला असताना पीओपी (प्लास्टर ऑफ पॅरिस) मूर्ती निर्मितीवरून निर्माण झालेली अनिश्चितता अनेक मूर्तिकारांसाठी अडचणीची ठरली आहे. पीओपी मूर्तीवरील बंदी उशिरा उठवली गेली आहे. यामुळे यंदा अमरावती च्या बाजारात मूर्तीची टंचाई आणि २० ते २५ टक्क्यांनी दरवाढ होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.



यंदाचा गणेशोत्सव आर्थिक सापडलेल्या संकटात मूर्तिकारांसाठी अधिकच कठीण ठरू शकतो. शिवाय गणेशोत्सव यंदाचा भाविकांसाठीदेखील आर्थिक टंचाईचा जाणवणार आहे. कारागिरांना मूर्ती विक्रीच्या दृष्टीने आव्हानात्मक असणार आहे. पीओपीवरील बंदीवर वेळेत निर्णय न झाल्यामुळे मूर्तिकार आणि ग्राहकदोघांनाही अडचणींचा सामना करावा लागणार आहे. दरवाढ आणि टंचाई टाळायची असल्यास नागरिकांनी वेळेत बुकिंग करणे आवश्यक आहे.वेळेअभावी जिल्ह्यात गणेशमूर्ती निर्मितीदेखील कमी प्रमाणात झाली आहे. त्यामुळे भाविकांना मूर्तीसाठी दुसऱ्या गावी जावे लागण्याची शक्यता आहे.पीओपी'वरील बंदी उठविण्यात आल्याने पुन्हा एकदा शाडूच्या मूर्तीचे भाविकांमध्ये आकर्षण वाढल्याचे दिसून येत आहे.

### दरात २५ टक्क्यांनी वाढ

तयार मूर्तीची संख्या कमी असल्याने यंदा श्रीगणेशाच्या मूर्तीच्या किमतीमध्ये २० ते २५ टक्क्यांपर्यंत वाढ होण्याची शक्यता आहे.

### मूर्तिकार, कारागीर संकटात

कच्च्या मालाच्या किमतीत प्रचंड वाढ झाली आहे. त्यामुळे यंदा मूर्ती कारागीरदेखील मोठ्या अडचणीत सापडले आहेत.

# शाळा झाली शेत, पोरं झाली शेतकरी पोषणासाठी हिरवा उपक्रम

## प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना : विद्यार्थ्यांना श्रमदानासह पर्यावरणाचेही धडे

विदर्भ प्रजासत्ताक
दि.५अमरावती

प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माणयोजनेअंतर्गत केंद्र शासनाने शाळांमध्ये परसबाग निर्माण करून सदर परसबागांमधून उत्पादित भाजीपाला व इतर पदार्थांचा समावेश शालेय पोषण आहारामध्ये करण्याचे निर्देश दिले आहेत. या योजनेची अंमलबजावणी जिल्ह्यात केली जात आहे. सर्व शाळांमध्ये परसबाग तयार करण्यात येत असून, यातून आता भाजीपाला पिकविला जाणार आहे.




शाळांमध्ये परसबाग निर्माण करून त्यातून उत्पादित भाजीपाला व इतर पदार्थाचा विद्यार्थ्यांच्या शालेय पोषण आहारात समावेश केला जातो. यातून विद्यार्थ्यांना शेती, मेहनत, सेंद्रिय उत्पादन आणि पर्यावरणाचेही धडे मिळण्यास मदत होते. या उपक्रमाला प्रोत्साहन देण्यासाठी स्पर्धेअंतर्गत शाळांना रोख बक्षिसेही मिळणार आहेत.

जिल्ह्यात परसबाग उपक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी विभागामार्फत उत्कृष्ट परसबाग स्पर्धा आयोजित करण्यात येते. विद्यार्थ्यांनी परसबागेत पिकवलेला भाजीपाल्याचा वापर आहारात केला जाणार आहे.त्यामुळे विद्यार्थ्यांचे पोषण होणार आहे.

### आकर्षक बक्षिसे देत उत्कृष्ट शाळांचा होणार गौरव

ज्या शाळांमधील परसबाग चांगली फुलली आहे. भाजीपाल्याचे उत्पादन होत असून त्याचा वापर शाळेच्या पोषण आहारात वापरला जात आहे. शाळांचा गौरव बक्षिसाने केला जाणार आहे.

### समितीकडून परसबागांचे होईल मूल्यमापन

तालुकास्तरीय, जिल्हास्तरीय समितीकडून शाळांमधील परसबागांचे मूल्यमापन केले जात असते. मागील शैक्षणिक सत्रात शाळांच्या परसबागांचे मूल्यमापन करण्यात आले.

### काय आहे योजना ?

शालेय परसबाग योजना म्हणजे शाळेच्या आवारात एक विशिष्ट जागा निवडून तिथे भाजीपाला, फळे आणि औषधी वनस्पतींची लागवड करणे. याचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना निसर्गाच्या जवळ आणणे, त्यांना पोषक आहार मिळावा यासाठी मदत करणे आणि पर्यावरणाबद्दल जागरूकता वाढवणे हा आहे.

# एका महिन्यातच रस्ता उखडला; निकृष्ट कामामुळे जनतेत संताप; निंभोरा - परलाम रस्त्याची दुरावस्था



विदर्भ प्रजासत्ताक
दि.५अमरावती

भातकुली तालुक्यातील निंभोरा ते परलाम रस्ता अवघा महिनाभरापूर्वीच तयार करण्यात आला होता. मात्र, इतक्या अल्पावधीतच या रस्त्याची दयनीय अवस्था झाली आहे. ठिकठिकाणी खड्डे पडल्याने वाहनधारक व नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. संबंधित रस्त्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक ४, अमरावतीच्या अंतर्गत करण्यात आले असून ठेकेदाराने अतिशय निकृष्ट दर्जाचे काम केल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे.

यासंदर्भात युवासेना तालुकाप्रमुख प्रज्वल देशमुख यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत म्हटले की, अत्यंत कमी प्रमाणात डांबर वापरले गेले असून केवळ महिन्याभरातच रस्ता उखडून खड्ड्यांनी भरला आहे. हे प्रकरण गंभीर असून सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी आणि ठेकेदार यांच्यात मिलीभगत असण्याची शक्यता आहे.

देशमुख यांनी पुढे सांगितले की, रस्त्याच्या कामाच्या गुणवत्तेची चौकशी करून संबंधित अधिकारी व ठेकेदारावर कठोर कारवाई करण्यात यावी, तसेच या रस्त्याची तातडीने आणि पुन्हा नव्याने दुरुस्ती करावी. नागरिकांनी देखील यासंदर्भात नाराजी व्यक्त करत त्वरीत उपाययोजनांची मागणी केली आहे.

# वऱ्हा-घोटा परिसरात चोरांचा सुळसुळाट : एकाच रात्रीत तीन जबरी चोरीच्या घटना, नागरिकांत भीतीचं वातावरण

विदर्भ प्रजासत्ताक
दि.५ वऱ्हा–घोटा

वऱ्हा आणि घोटा परिसरात एका रात्रीत तीन ठिकाणी झालेल्या धाडसी चोरीच्या घटनांनी परिसरात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. किराणा दुकान, घर व पानटपरी अशा तीन वेगवेगळ्या ठिकाणी ५ ऑगस्ट २०२५ रोजी मध्यरात्री चोरट्यांनी घडवलेले प्रकार पोलीस प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारे ठरले आहेत.

पहिली घटना वऱ्हा येथील आहे. येथील रोशन विनोद बद्रे यांच्या किराणा दुकानात रात्री ३ ते ४ दरम्यान चोरट्यांनी सेंध घालून सुमारे ८,००० रुपये रोख आणि १०,००० ते १२,००० रुपयांचा चिल्लर माल चोरून नेला. सकाळी दुकान उघडल्यावर चोरी उघडकीस आली. या घटनेमुळे स्थानिक व्यापाऱ्यांमध्ये संतापाचा सूर आहे.

दुसरी घटना त्याच गावात, गणेश रामचंद्र रावेकर यांच्या घरी घडली. संपूर्ण कुटुंब बालाजी दर्शनासाठी बाहेर गेले असताना, घरी उपस्थित वृद्ध आई-वडिलांच्या अनुपस्थितीत चोरट्यांनी घराची साकळी तोडून प्रवेश केला. त्यांनी सोन्याची नथ, सोन्याच्या गठू आणि चांदीच्या तोरड्या असा सुमारे २०,००० ते २५,००० रुपयांचा ऐवज लंपास केला. महिलांमध्ये आणि लहानग्यांमध्ये भीतीचं वातावरण पसरलं आहे.

तिसरी घटना घोटा गावातील निलेश सुरेश रताळे यांच्या पानटपरीत घडली. येथेही चोरट्यांनी धाडसी प्रवेश करून सुमारे १०,००० रुपये



रोख रक्कम व काही किरकोळ वस्तू चोरल्या.

या तीनही घटनांमुळे परिसरात चोरट्यांचा सुळसुळाट झाल्याची चर्चा असून, नागरिकांमध्ये अस्वस्थता पसरली आहे. पोलीस प्रशासनाने तातडीने गस्त वाढवावी आणि चोरट्यांना अटक करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

या तिन्ही गंभीर घटनांची नोंद कुऱ्हा पोलीस स्टेशन येथे झाली असून, सहाय्यक पोलीस निरीक्षक डॉ. अनुप वाकडे, पोलीस कॉन्स्टेबल सपना निरगुळे व पोलीस शिपाई अक्षय विरघट हे तपास करत आहेत. तसेच अमरावती गुन्हे शाखेला पाचारण करण्यात आलं आहे.

या घटनांमुळे पोलिसांची कार्यपद्धती, गस्त व्यवस्था आणि चोख बंदोबस्ताबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत असून, नागरिक आता अधिक सतर्क राहण्याचा सल्ला देत आहेत.

# शकुंतला रेल ब्रॉड गेज करण्यासाठी शकुंतला रेल बचाव सत्याग्रह समितीची सलग ७ व्या वर्षी ३६ वी आढावा बैठक संपन्न

## ९ ऑगस्ट क्रांती दिनी श्रमदानातुन स्वच्छता अभियान

विदर्भ प्रजासत्ताक
दि.५अचलपूर

शकुंतला रेल बचाव सत्याग्रह समिती अचलपूरची आपली झुक झुक गाडी- शकुंतला रेल गाडी....एक्सप्रेस करण्यासाठी क्रांती दिनी व स्वातंत्र दिनी होणाऱ्या ३६ व्या जनआंदोलनच्या आयोजन-नियोजनची बैठक साईनाथ मोटर्स येथे विविध सामाजिक संघटनचे पदाधिकारी यांच्या उपस्थित पार पडलीशकुंतला रेल्वे पुन्हा सुरू व्हावी आणि गोरगरीब, आदिवासी, विद्यार्थी, व्यापारी, शेतमजूर यांना न्याय मिळावा,आपल्या क्षेत्रातील



औद्योगिक विकास,व्यापार वाढावा म्हणून शकुंतला रेल बचाव सत्याग्रह समिती सतत ७ वर्षापासून लढा देत आहे.. गल्ली ते दिल्ली पर्यंत शकुंतला साठी स्व-खर्चाने पाठपुरावा घेत आहे, तरी सुद्धा शकुंतला रेल्वेचा विचार शासन गांभीर्याने करत नसल्याने पुन्हा २०२५ चे हे तिसरे जनआंदोलन करण्यासाठी ९ ऑगस्ट क्रांती दिन व १५ ऑगस्ट स्वतंत्र दिनी रेल्वे स्टेशन स्वच्छता,ध्वजारोहण, तिरंगा पदयात्राचे नियोजन करण्यात आले आहे... सदर आढावा बैठकीत शकुंतला रेल बचावचे योगेश खानझोडे, राजेश अग्रवाल, दिपा तायडे, शारदा उईके, संतोष नरेडी,कमल केजरीवाल, राजकुमार बरडीया,धनंजय नाकील, सुरेश प्रजापती, सुनीता वैद्य, वसंतराव धोबे, राजेश पांडे, दयाराम चंदेल,गजुभाऊ कोल्हे, राजा धर्माधिकारी, रामदास मसने,मुरलीधर ठाकरे, संजय डोंगरे,प्यारेलाल प्रजापती,किरण गवई यांच्या उपस्थितीत पुढील नियोजन करण्यात आले पुढील जणआंदोलन प्रति पूर्ण माहिती योगेश खानझोडे, दिपा तायडे यांनी दिली.

# सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाची अंमलबजावणी करा; रखडलेल्या पदभरतीसाठी आदिवासी विद्यार्थ्यांचे जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक आंदोलन

विदर्भ प्रजासत्ताक
दि.५अमरावती

आदिवासी विद्यार्थ्यांनी रखडलेली भरती प्रक्रिया तात्काळ सुरू करण्याची मागणी करत आज जिल्हाधिकारी कार्यालयावर जोरदार धडक दिली. सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाची अंमलबजावणी होत नसल्यामुळे हजारो पात्र आदिवासी युवक-युवती बेरोजगार राहत असून, शासनाच्या उदासीन धोरणाविरोधात संताप व्यक्त करण्यात आला.

'आदिवासी विद्यार्थी कृती समिती'च्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन देण्यात आले. यावेळी बिरसा क्रांती दलाचे विदर्भ युवा अध्यक्ष अर्जुन युवनाते, तसेच पल्लवी कुमरे, आरती गोरे, निखिल शेडमाके, पायल



कोकाटे, प्राची मसराम आदींसह शेकडो विद्यार्थी उपस्थित होते.

सुप्रीम कोर्टाचा ६ जुलै २०१७ रोजीचा निर्णय व शासनाचा १२ डिसेंबर २०११ रोजीचा आदेश असूनही १२,५२० विशेष पदांची भरती प्रक्रिया अद्याप सुरू झालेली नाही, असा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. यासोबतच ८५,००० रिक्त पदांवरही भरती रखडलेली आहे, त्यामुळे आदिवासी समाजात तीव्र असंतोष निर्माण झाला आहे.

दिनांक १६ जुलैपासून हिंगोली व परभणी येथे साखळी उपोषण सुरू असूनही शासनाने अद्याप कोणतीही ठोस पावले उचललेली नाहीत. यामुळे आदिवासी विद्यार्थ्यांमध्ये रोष आहे. मागण्या घटनात्मक व न्याय्य असूनही सरकार दुर्लक्ष करत असल्याचा आरोप कृती समितीने केला आहे.

### अन्यथा तीव्र आंदोलन छेडू कृती समितीचा इशारा

या मागण्यांकडे तात्काळ लक्ष न दिल्यास, लोकशाही मार्गाने राज्यभर तीव्र आंदोलन छेडले जाईल, आणि त्यासंबंधित संपूर्ण जबाबदारी शासनावरच राहील, असा इशारा निवेदनात देण्यात आला आहे.

# घराबाहेर चारचाकी, आता रेशनची नांगी! तहसील स्तरावर बोगस लाभार्थ्यांचा शोध

विदर्भ प्रजासत्ताक
दि.५अमरावती

दारापुढे चारचाकी असणारे व आयकर भरणारे नागरिकदेखील मोफतच्या रेशनचा लाभ घेत असल्याचे निदर्शनात आले आहे. अशा ३९,९५६ रेशनकार्डधारकांची यादी शासनाद्वारे पुरवठा विभागाला प्राप्त झाली आहे. या लाभार्थ्यांचा शोध पुरवठा विभागाद्वारे घेण्यात येत आहे व त्यानंतर त्यांचे रेशन बंद करण्यात येणार आहे.

पुरवठा विभागाद्वारे अंत्योदय व प्राधान्य गटातील रेशनकार्डधारक व लाभार्थ्यांना मोफत धान्याचा लाभ देण्यात येत आहे.



यामध्ये अपात्र नागरिक सार्वजनिक वितरण प्रणालीमध्ये मोफत धान्याचा लाभघेत आहेत. त्यामुळे केंद्र शासनाद्वारे अशा अपात्र नागरिकांचा शोध संगणकीय प्रणालीने घेण्यात आला वही यादी राज्य शासनाला पाठविण्यात आली व शासनाद्वारे ही यादी पुरवठा विभागाला देण्यात आलेली आहे.जिल्ह्यात अंत्योदय गटात १,२९,२०३ रेशनकार्डधारक व प्राधान्यगटात ३,७९,४२४ रेशनकार्डधारक आहे. असे एकूण ५,०८,६२७कार्डधारक व २०,१६,२७० लाभार्थी आहेत.(कलर बॉक्स)तहसील स्तरावर बोगस लाभार्थ्यांचा शोध

शासनाद्वारे पुरवठा विभागाला प्राप्त यादी जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांद्वारे जिल्ह्यातील १४ ही तहसीलदार यांना पाठविण्यात आलेली आहे. त्यांच्याद्वारे यादीमधील बोगस लाभार्थ्यांचा शोध घेण्यात येत आहे.


# शेतकऱ्यांचा 'वाशीम शेती शिल्प' ब्रँड

## स्थानिक उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देणार - मुख्यमंत्री

विदर्भ प्रजासत्ताक
दि.५अकोला

वाशीम जिल्ह्यात शेतकऱ्यांनी मेहनतीने गुणवत्तापूर्ण उत्पादनाचे प्रतीक ठरलेल्या 'वाशीम शेती शिल्प' या स्थानिक कृषी ब्रँड तयार केला. त्या अंतर्गत चिया बियाण्यांचे उत्पादन करण्यात आले आहे. त्याचे नमुने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. यांनी भेट स्वरूपात सादर केले. वाशीम जिल्ह्यात हा उपक्रम हाती घेत शेतकऱ्यांच्या उत्पादनाला राज्यस्तरावर पोहोचवण्याची दिशा मिळाली आहे.

वाशीम जिल्हा कृषी प्रधान



असून, शेतकऱ्यांनी विविध पीक उत्पादनामध्ये आपली विशिष्ट ओळख निर्माण केली आहे. जिल्ह्यातील दर्जेदार शेतमालाचा 'वाशीम शेती शिल्प' हा ब्रँड विकसित करण्यात आला आहे. या अंतर्गत उत्पादित होणारी चिया बियाणे ही एक पोषण मूल्यांनी समृद्ध आणि बाजारात मागणी असलेली नगदी पीक मानले जाते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या घेतलेल्या भेटीद्वारे केवळ वाशीमच्या कृषी उत्पादनांना मान्यता मिळाली नाही, तर शेतकऱ्यांच्या परिश्रमालाही शासन पातळीवर गौरव झाला. जिल्हाधिकाऱ्यांनी मुख्यमंत्र्यांपुढे हा उपक्रम मांडताना सांगितले की, 'शेतकऱ्यांचे उत्पादन हे दर्जेदार असून, योग्य विपणन आणि शासनाची साथ मिळाल्यास त्यांचा आर्थिक स्तर उंचावता येईल.'

### बाजारपेठेची साखळी निर्माण केली जाणार

'वाशीम शेती शिल्प' या ब्रँड अंतर्गत पुढील काळात इतरही उत्पादनांना स्थानिक ओळख देत बाजारपेठेची साखळी निर्माण केली जाणार आहे. या उपक्रमामुळे जिल्ह्यातील तरुण शेतकऱ्यांमध्येही नव्या प्रेरणेला चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. मुख्यमंत्र्यांनी या उपक्रमाचे कौतुक करत, स्थानिक उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्याच्या प्रयत्नांना सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.